RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
ADVO CATE
संपर्क
ॲड. सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

दि. 17 मे 2026



१९२९- डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सायमन कमिशनला भिन्न मतपत्रिका सादर केली.

१९३६ व १९३८- अस्पृश्य परिषदेत कल्याण येथे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार, 17 मे २०२६
Sunday, 17 May 2026
वर्ष : ६ | अंक : १३७
Year : ६ | Issue : 137
दैनिक
Daily
किंमत : ₹ ५/-
Rate: Rs. 5/-

## महत्वाच्या बातम्या

### अंदमान-निकोबारमध्ये मान्सून दाखल

**नवी दिल्ली :** शेतकऱ्यांसाठी आणि कडाक्याच्या उन्हात होरपळणाऱ्या नागरिकांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. यंदा नैऋत्य मान्सून आपल्या ठराविक वेळेच्या आधीच देशात दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, आज १६ मे २०२६ रोजी अंदमान आणि निकोबार बेटांवर मान्सून दाखल झाला आहे.



हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनची पुढील वाटचाल अत्यंत वेगाने आणि अनुकूल गतीने सुरू असून, येत्या २६ मे रोजी तो केरळच्या किनारपट्टीवर धडकेल अशी दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. नैऋत्य मान्सून आज १६ मे रोजी दक्षिण-पूर्व अरबी समुद्राचा काही भाग, दक्षिण-पश्चिम आणि दक्षिण-पूर्व बंगालचा उपसागर, अंदमान समुद्राचा बहुतांश भाग, संपूर्ण निकोबार बेट आणि 'श्री विजयपूरम'सह अंदमान बेटांच्या काही भागात अधिकृतपणे दाखल झाला आहे.

देशात साधारणपणे १ जूनच्या आसपास केरळमध्ये मान्सूनचा प्रवेश होतो. त्यानंतर तो टप्प्याटप्प्याने उत्तरेकडे सरकत संपूर्ण देश व्यापतो. जून ते सप्टेंबर या कालावधीत असणाऱ्या पावसाळी हंगामाची अधिकृत सुरुवात मान्सूनच्या केरळ प्रवेशापासून होते. मात्र यंदा अंदमानात असलेली गती पाहता मान्सून सरासरी वेळेच्या जवळपास ६ दिवस आधी म्हणजेच २६ मे २०२६ रोजी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे.

### पुढील १५ दिवस जीवघेणी उष्णतेची लाट

**नागपूर :** मध्य भारत सध्या तीव्र उष्णतेच्या विळख्यात सापडला असून नागपूर, विदर्भ, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअस दरम्यान आहे. हवामान विभागाने पुढील १५ दिवस कोरडे आणि अत्यंत उष्ण 'लू'चे वारे आणखी तीव्र होण्याचा इशारा दिला आहे. उष्णतेमुळे रुग्णालयांमध्ये उष्माघात, निर्जलीकरण, उलट्या-जुलाब आणि श्वसनविकारांच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून डॉक्टरांनी नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन नागपुरातील क्रिम्स रुग्णालयाचे संचालक व ज्येष्ठ श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. अशोक अरबट आणि इतरही तज्ज्ञ डॉक्टरांनी केले आहे.



विदर्भ, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये तापमान ४६ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत असून गरम वाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. हवामान विभागाने पुढील १५ दिवस 'लू'चा धोका अधिक तीव्र राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे वृद्ध, लहान मुले आणि बाहेर काम करणाऱ्यांनी विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. उष्माघात, गंभीर निर्जलीकरण, हीट एक्सॉशन, स्नायूंमध्ये गोळे येणे, उलट्या-जुलाब आणि तापाच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

### उष्णतेच्या लाटेचे निकष बदलणार

**मुंबई :** भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून उष्णतेची लाट किंवा सदृश्य स्थिती जाहीर करण्याचे सध्याचे निकष हे भारतातील भौगोलिक स्थितीला अनुकूल नसल्याने भारतीय हवामानशास्त्र विभाग आणि विभागाशी संबंधित असणारे इतर विभाग लवकरच भारतात उष्णतेची लाट जाहीर करण्याचे निकष अद्यावत करणार आहेत. जागतिक पातळीवर हवामानात बदल होत असून भारतातही हवामानात मागील काही दिवसांपासून झपाट्याने बदल होत आहेत. यंदा भारतात उष्णतेच्या लाटेसदृश्य स्थितींच्या घटनांमध्ये वाढ झाली असून उष्णतेची तीव्रताही वाढली आहे. राज्यातही सध्या विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये ही स्थिती मागील काही दिवसांपासून कायम आहे.




उष्णतेची लाट किंवा सदृश्य स्थिती हवामान विभागाकडून जाहीर केली जाते आणि त्यानुसार ती स्थिती किती दिवस राहील याचे अंदाजही हवामान विभागाकडून प्रसिद्ध केले जात असतात. सध्या देशातील राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र राज्यातील काही भागात उष्णतेच्या लाटेसदृश्य स्थितीची नोंद होत असून अनेक भागात उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

हवामान विभागाकडून मैदानी प्रदेश, पठारी भाग आणि किनारपट्टीसाठी उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती जाहीर करण्याचे वेगवेगळे निकष वापरण्यात येतात. सध्या केरळ राज्यात हवामान विभागाकडून वापरण्यात येणाऱ्या निकषांच्या मर्यादेमुळे उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती जाहीर करण्यात अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर निकषांचा भारतीय भौगोलिक स्थितीनुसार विचार करण्यात येणार आहे.

## "धर्मेंद्र प्रधानांना बडतर्फ करा"

### राहुल गांधींची मागणी

**नवी दिल्ली :** नीट परीक्षेसाठी दोन वर्षांत २२ लाख विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. दिवस रात्र अभ्यास केला. पण हे सगळे फुकट गेले. संपूर्ण देशाला आता माहिती झाले आहे की, परीक्षेच्या दोन दिवस आधी व्हॉट्सॲपवर नीट परीक्षेचा पेपर शेअर केला जात होता. पंतप्रधान मोदी यांनी तत्काळ आदेश द्यायला हवेत की, धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. त्यांना बडतर्फ करण्यात यावे आणि या प्रकरणात जे दोषी आहेत, त्यांना पकडून जेलमध्ये टाकायला हवे, अशी मागणी काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली.

नीट परीक्षा रद्द झाल्यापासून देशभरात अनेक ठिकाणी पेपर लीक प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. अटकसत्र सुरू आहे. महाराष्ट्रातील लातूर, पुणे येथूनही काही महत्त्वाच्या संशयितांना अटक करण्यात आली आहे. यावरून विरोधक केंद्र सरकारवर टीका करत आहेत. एक्सवर एक व्हिडिओ पोस्ट करत राहुल गांधी यांनी नीट परीक्षा रद्द होणे, पेपर लीक होणे यावरून सरकारवर टीका केली. तसेच भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर गंभीर आरोप केले. एक्सवरील आपल्या व्हिडिओत राहुल गांधी म्हणतात की, देशाचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे म्हणणे आहे की, या प्रकाराशी माझा काही संबंध नाही. समितीने त्यांना काही शिफारसी केल्या होत्या. परंतु, त्याला त्यांनी केराची टोपली दाखवली. विरोधक या समितीत आहेत, त्यांच्या शिफारसी दखल



घेण्यासारख्या नाहीत, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

सत्य हे आहे की, मुख्य गाभा आहे, त्याला आपण धक्का लावला आहे. ही एक टोळी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ , भाजपा आणि विद्यापीठांमध्ये यांचे जे कुलगुरू बसवले आहेत, प्रोफेसर बसवले गेले आहेत, त्यांचा पैसे कमावण्याचा हा गट आहे. या गटानेच देशाची शिक्षण व्यवस्था संपवून टाकली आहे, असा मोठा आणि गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला. तसेच २२ लाख विद्यार्थ्यांची फसवणूक झाली आहे. तरी, मोदी चकार शब्दही काढत नाहीत. धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ पदावरून हटवा, नाहीतर स्वतः जबाबदारी घ्या, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सगळ्या देशाला माहिती आहे की, तुम्हाला कुलगुरू व्हायचे असेल, तर अनुभव आणि शिक्षण यांच्या काहीही आवश्यकता नाही. जर तुम्ही संघाच्या विचारांचे असेल, तर तुम्ही त्या पदापर्यंत जाऊ शकता. पण जर तुमची विचारधारा संघाची नसेल, तर तुम्ही त्या पदावर बसू शकत नाही. हेच कारण आहे, ज्यामुळे देशात ८० वेळा पेपर लीक झाला आहे आणि २ कोटी विद्यार्थ्यांचे भविष्य बरबाद झाले आहे, असा मोठा दावा राहुल गांधी यांनी केला.

## जरांगे यांची नवव्या उपोषणाची घोषणा



**छत्रपती संभाजीनगर :** हैदराबाद गॅझेटिअर लागू झाले ते सप्टेंबर २०२५ मध्ये. तेव्हापासून एप्रिल महिन्यापर्यंत मिळालेल्या कुणबी प्रमाणपत्राची संख्या आहे ५२ हजार २३०. गेल्या आठ महिन्यात वितरित करण्यात आलेले प्रमाणपत्रांचा वेग कमी असल्याचा जरांगे यांचा दावा आहे. मात्र, आलेले अर्ज आणि सापडलेल्या नोंदी याचा ताळमेळ चित्र वेगळेच असल्याचे दाखवत आहे. आकडेवारीचा हा मेळ आणि राजकीय पटावरील भाजप आणि शिवसेनामध्ये सुरू असणाऱ्या ताणतणावाच्या चर्चांचा संबंध घातला जात आहे. जरांगे यांनी शनिवारी त्यांच्या नवव्या उपोषणाची घोषणा केली.

१९०१ मध्ये निजाम सरकारच्या काळात जनगणना झाली होती. या जनगणनेमध्ये मराठवाड्यातील तत्कालीन पाच जिल्ह्यांतील कुणबी जातीची लोकसंख्या नोंदविण्यात आली होती. तेव्हा म्हणजे १२४ वर्षापूर्वी छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, नांदेड आणि परभणी या पाच जिल्ह्यातील लोकसंख्या होती २८ लाख ९८ हजार १४१ एवढी. त्यातील कुणबी नोंदीचा एकत्रित आकडा न्या. शिंदे समितीच्या अभ्यासात आढळून आला तो १० लाख ४८ हजार ५०० एवढा. एकूण लोकसंख्येच्या ३६.१८ टक्के कुणबी होते. पण पेच नंतर उभा राहिला. ज्या माहितीच्या आधारे हे आकडे काढले गेले त्याच्या गावस्तरावरच्या नोंदीच सरकारी दप्तरी उपलब्ध नाहीत.

## रेल्वेत कर्मचारी कपात

**नागपूर :** भारतीय रेल्वेत आगामी २०२६-२७ आर्थिक वर्षात मनुष्यबळ सुसूत्रीकरणाचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार देशभरातील मंजूर पदांच्या दोन टक्के पदांची कपात करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे देशातील विविध रेल्वे झोन आणि उत्पादन युनिट्समधील मिळून सुमारे २९ हजार ६०८ पदे कमी होणार आहेत.

रेल्वे बोर्डाचे संचालक अमित सिंह मेहरा यांनी २४ एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, सर्व विभागीय रेल्वे, उत्पादन युनिट आणि अन्य विभागांसाठी मंजूर मनुष्यबळाच्या दोन टक्के पदांचे मनुष्यबळाचे सुसूत्रीकरण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. यामध्ये पदांचे पुनर्वितरण आणि अनावश्यक पदे रद्द करण्याचा समावेश आहे. ही प्रक्रिया 'एचआरएमएस' पोर्टलमार्फतच राबवण्याचे निर्देश देण्यात आले.

रेल्वे बोर्डाने झोननिहाय निश्चित केलेली उद्दिष्टे वार्षिक कार्यक्षमतेच्या सामंजस्य करारांमध्ये समाविष्ट केली आहेत. त्यामुळे प्रत्येक विभागीय महाव्यवस्थापकांना या लक्ष्यांची पूर्तता करणे बंधनकारक आहे. तसेच वर्षअखेरीस मोठा ताण येऊ नये म्हणून ही प्रक्रिया तिमाही आधारावर पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे देशातील सर्व प्रमुख झोनवर परिणाम होणार आहे. उत्पादन युनिट्समध्येही मनुष्यबळ कपातीचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्सला २१४, रेल कोच फॅक्टरीला १४७, मॉडर्न कोच फॅक्टरीला २१७, बनारस लोकोमोटिव्ह वर्क्सला ११५ आणि पाटियाला लोकोमोटिव्ह वर्क्सला ६९ पदांचे सुसूत्रीकरण करावे लागणार आहे.

## नागपुरात ५०० आदिवासी विद्यार्थ्यांचे मध्यरात्रीपासून ठिय्या आंदोलन

### आयुक्त कार्यालयासमोर विद्यार्थ्यांचा एल्गार !

**नागपूर:** राज्याची उपराजधानी नागपुरातून एक मोठी आणि खळबळजनक बातमी समोर येत आहे. आदिवासी विकास आयुक्त कार्यालयासमोर विविध न्याय्य मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी काल मध्यरात्रीपासूनच तीव्र ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. शिष्यवृत्ती, शैक्षणिक खर्च आणि निर्वाह भत्ता वेळेत मिळत नसल्याने संतप्त झालेल्या वसतिगृहातील सुमारे ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला असून प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आंदोलक विद्यार्थ्यांचा आरोप आहे की, शिष्यवृत्ती आणि इतर आर्थिक लाभ वेळेत न मिळाल्यामुळे त्यांच्या दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाले आहे. हक्काचे पैसे वेळेत मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणावरही याचा गंभीर परिणाम होत आहे. अनेक वेळा संबंधित विभागाकडे लेखी आणि तोंडी पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून केवळ पोकळ आश्वासने मिळाली, त्यामुळेच हा संताप अनावर झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.



मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या या आंदोलनामुळे आदिवासी विकास आयुक्त कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांनी 'आरपारची लढाई' पुकारली असून, मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलनस्थळावरून न हलण्याचा आक्रमक पवित्रा घेतला आहे. आता यावर प्रशासन काय तोडगा काढणार आणि विद्यार्थ्यांची रखडलेली शिष्यवृत्ती कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आम्ही वारंवार प्रशासनाकडे आमच्या हक्काच्या शिष्यवृत्तीसाठी आणि भत्त्यासाठी हेलपाटे मारले आहेत. पण आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले गेले. आता जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत आणि लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत आम्ही हे आंदोलन मागे घेणार नाही !

**- गणेश इरपाचे (आंदोलक विद्यार्थी)**

## आपण कोरोनासारख्या आपत्तींच्या जवळ जात आहोत : विजय वडेट्टीवार

**नागपूर :** हजारो वर्षांपूर्वी तथागत भगवान गौतम बुद्धांनी देश आणि जगाला अहिंसा, शांती, प्रेम आणि करुणेचा जो मार्ग दाखवला, तो आजच्या आधुनिक युगात अधिकच प्रासंगिक झाला आहे. आज जेव्हा संपूर्ण जग लोभ, मोह, माया आणि द्वेषाच्या जाळ्यात अडकून बदलत्या परिस्थितीमुळे त्रस्त आहे, अशा वेळी मानवी समाजाचे कल्याण केवळ बुद्धांच्या विचारांनीच शक्य आहे. हे प्रतिपादन माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी नागपूरच्या देशपांडे सभागृहात आयोजित 'विश्व शांती परिषद २०२६' च्या दुसऱ्या दिवशी व्यक्त केले.

माजी मंत्र्यांनी आवर्जून सांगितले की, द्वेष आणि हिंसेला कधीही हिंसेने मिटवता येत नाही; अहिंसा आणि शत्रुत्वावर केवळ प्रेम आणि करुणेनेच विजय मिळवता येऊ शकतो. सध्याच्या विषम आणि आव्हानात्मक परिस्थितीत तथागत बुद्धांचे सिद्धांतच जगाला विनाशापासून वाचवू शकतात. समाज, देश आणि संपूर्ण जगाच्या प्रगतीचा व शांतीचा रस्ता केवळ धम्माच्या मार्गावरूनच जातो. देशातील सध्याची परिस्थिती पाहता असे वाटते की, खूप लवकरच आपल्याला कोरोनासारख्या आपत्तींचा सामना करावा लागेल, ज्यासाठी




आपल्याला आत्तापासूनच तयार राहावे लागेल.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आणि त्रिशरण-पंचशील ग्रहणाने झाली. हा सोहळा इंडो एशियन मेत्ता फाउंडेशन, संघ काया फाउंडेशन, दीक्षाभूमी चॅरिटेबल ट्रस्ट, ग्लोबल युनायटेड एज्युकेशन अँड सोशल सोसायटी, आणि शताब्दी बहुउद्देशीय संस्था यांसह विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भंते प्राशील रत्न यांनी केले, स्वागतपर भाषण रमेश वानखेडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नितीन गजभिये यांनी केले.

या प्रसंगी श्रीलंका सरकारचे माजी मंत्री विजयदासा राजपक्षे, रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, भंडारा-गोदियाचे खासदार प्रशांत पडोले, माजी मंत्री सुनील केदार यांच्यासह महानायक भंते मदम्पगामा अस्सजी थिसा, अंबलगोडा धम्मलंकारा थेरो, डॉ. ली ची रान (दक्षिण कोरिया), भंते थेपसाकदा फेतसालाथ (लाओस), भिक्षू तपसी धम्म (नेपाळ), डॉ. एम.के. ओटानी, पंकज सेठी, भंते राजरत्नजी आदी मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक आणि धम्म कार्यक्रम या सोहळ्यादरम्यान उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते शेकडो भिक्खू संघाला संघदान करण्यात आले, तसेच 'धम्म दूत अवॉर्ड' चे वितरण आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावरील 'संघर्ष' या नाटिकेचे शानदार सादरीकरण करण्यात आले. रात्रीच्या वेळी उत्तर नागपुरातील इंदोरा मैदान येथे सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये थायलंडच्या बौद्ध गायिका सिस्टर अनमीताचाई, डॉ. धनश्री बुरबुरे आणि राजेश बुलबुल यांनी एकाहून एक सरस भीम-बुद्ध गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची भरभरून दाद मिळवली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी रमेश वानखेडे, स्मिता वाकडे, रत्नदीप रंगारी, क्षितिज गायकवाड, नरेश महाजन, मुकेश बागडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## शर्तभंग नियमितीकरणाचे महसूलमंत्र्यांकडे असणारे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना

**मुंबई :** घरे व शेतीविषयक शर्तभंग नियमितीकरणाचे महसूलमंत्र्यांकडे असणारे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना सोपविण्याचा ऐतिहासिक निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला. याबाबतचे राजपत्र जारी करण्यात आले. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेकदा शर्तभंगाच्या अतिशय जुजबी प्रकरणात मंत्रालय गाठावे लागते. यासाठी वेळ, पैसा खर्च होतो. सर्वसामान्य जनतेला होणारा हा त्रास लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दहा लाखांपर्यंत दंड असलेली शर्तभंगाची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच, वीस लाखांपर्यंत दंड असलेली प्रकरणे विभागीय आयुक्तांकडे निकाली काढण्यासाठी सोपविली आहेत. या अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेबाहेरील प्रकरणांचे निर्णय मंत्रालयस्तरावर घेतले जातील, असे प्रसिद्ध झालेल्या राजपत्रात नमूद आहे.



राज्यभरात शर्तभंगाची प्रकरणे वाढत असल्याने अशा प्रकरणांच्या कायदेशीर निवड्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमध्ये विधी व न्याय विभागाच्या निर्देशानुसार विधीमंडळाच्या गेल्या अधिवेशनात बदल करण्यात आले. त्यांनतर शुक्रवारी याबाबतचे राजपत्र जारी करण्यात आले. ज्या नागरिकांचे व्यवहार तांत्रिक अडचणींमुळे अडकले होते, त्यांना आता दिलासा मिळणार आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी जनतेशी चर्चा करण्यात आली. यासंदर्भातील निवेदने सरकारकडे आली आहेत. नागरिकांना छोट्या-छोट्या प्रकरणांसाठी मंत्रालयात येण्याची गरज भासू नये, हा यामागचा उद्देश आहे.

**आतापर्यंत शासनाने कब्जेहक्काने किंवा भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींच्या बाबतीत होणारे शर्तभंग नियमित करण्यासाठी कोणतीही स्पष्ट कायदेशीर तरतूद नव्हती. हे काम केवळ शासकीय परिपत्रकांच्या आधारे केले जात होते. मात्र, या प्रक्रियेला कायदेशीर आधार नसल्याने अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट होत होती किंवा प्रलंबित राहत होती. ही उणीव आता दूर झाली आहे. - चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री.**

## गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त !

### शिल्लक आठ सशस्त्र नक्षल्यांना अटक, तर पाच जणांचे आत्मसमर्पण

**गडचिरोली :** पोलीस दरबारी नोंद असलेले गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय सर्व सहा सशस्त्र नक्षलवाद्यांसह आठ जणांना अटक करण्यात पोलिसांना यश आले. याचबरोबर छत्तीसगडमधील पाच जणांनी आत्मसमर्पण केल्याने गडचिरोली जिल्हा आता नक्षलमुक्त झाल्याचे बोलले जात आहे. अटक करण्यात आलेल्या नक्षल्यांकडून ५१ शस्त्र व ६५ लाखांची रोकड जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे नक्षल चळवळीला मोठा हादरा बसला आहे.




**'ऑपरेशन अंतिम प्रहार'**

गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वाखाली काही दिवसांपासून नक्षल चळवळीविरोधात 'ऑपरेशन अंतिम प्रहार' राबविण्यात आले. गडचिरोली पोलिसांचे विशेष अभियान पथक व केंद्रीय राखीव पोलीस दलाने संयुक्तपणे सीमाभागात मोहीम उघडली होती. यादरम्यान तेलंगणातून चार, छत्तीसगड सीमाभागातील कुमणार व नैताळा येथून चार, असे एकूण आठ सशस्त्र नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली. यामध्ये राजू उर्फ मंगडू वेको (डिव्हीसीएम कंपनी क्र. १०), जनी उर्फ नगी येमला, जयराम गावडे, मुकेश उर्फ लच्छू अवलाम, विजय उर्फ मंगडू तामो, रजिता उर्फ शामबत्ती मडावी, ज्योती उर्फ समिता पोटावी, आमती उर्फ आयती इडमा पोडियाम यांचा समावेश आहे. यापैकी जयराम गावडे (रा. गिलनगुडा, एटापल्ली) हा एकमेव गडचिरोली जिल्ह्यातील रहिवासी आहे. इतर सर्व नक्षलवादी छत्तीसगडचे आहेत.

**आता एकही सशस्त्र नक्षलवादी सक्रिय नाही !**

पोलीस नोंदीनुसार ३१ मार्चनंतर गडचिरोलीत कंपनी क्रमांक १०चे केवळ सहा सदस्य सक्रिय होते. त्यापैकी मोनी मडावी हिने छत्तीसगडमध्ये आत्मसमर्पण केले, तर उर्वरित पाच जणांना अटक करण्यात आली. यामुळे गडचिरोली जिल्हा आता पूर्णपणे नक्षलमुक्त झाला असून सध्याच्या घडीला एकही सशस्त्र नक्षलवादी सक्रिय नाही. अटक करण्यात आलेल्या आठही नक्षलवाद्यांवर एकूण ६४ लाखांचे बक्षीस होते, अशी माहिती पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**आत्मसमर्पित नक्षल्यांमध्ये एक गडचिरोली जिल्ह्यातील**

यावेळी पाच नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यामध्ये मधू उर्फ राकेश वेळदा (डीव्हीसीएम), जीवन उर्फ जग्गू मडकाम, रजनी उर्फ दुर्गा धुर्वा, मंगली कुरसाम, लक्ष्मी पुणेम यांचा समावेश आहे. यापैकी राकेश वेळदा गडचिरोली जिल्ह्यातील असून उर्वरित सर्व छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. या सर्वांवर एकूण ३८ लाखांचे बक्षीस होते.

**६५ लाख रोकड आणि ५१ शस्त्र जप्त**

चौकशीदरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, नक्षलवाद्यांनी घातपाताच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात लपवून ठेवलेला शस्त्रसाठा आणि तब्बल ६५ लाख ३४ हजार रुपयांची रोख रक्कम पोलिसांनी जप्त केली. यात दोन एलएमजी रायफल, चार एके-४७, चार एसएलआर रायफल, तीन इन्सास रायफल यांसह एकूण ५१ बंदुकांचा समावेश आहे.

PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
◆ IDEAL FOR ◆
● Hostel/ Student Accommodation ● New College/ Educational Institution ● Residential College Campus ● Car/ Motorcycle Showroom ● Warehouse / Godown ● Supermarket (D-Mart Type)
CONTACT
DR. KAMBLE: 9422539451

# जात, धर्म आणि संविधानिक अस्तित्व

**जात महार, “धर्म बौद्ध” या प्रश्नामागील वास्तव**

भारतातील बौद्ध समाज आज एका अत्यंत महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. एका बाजूला तथागत बुद्धांची समता, करुणा आणि जातिविहीन समाजाची शिकवण आहे. तर दुसऱ्या बाजूला भारतीय समाजव्यवस्थेची कटू वस्तुस्थिती आहे. जी अजूनही माणसाला त्याच्या जातीने ओळखते. म्हणूनच जात महार की बौद्ध? हा प्रश्न निर्माण झाला आहे. हा प्रश्न अस्तित्वाचा, अधिकारांचा आणि पुढच्या पिढीच्या भविष्याचा प्रश्न आहे. अनेक तरुण भावनेच्या भरात म्हणतात, आम्ही बौद्ध आहोत, मग ‘महार’ का लिहायचंऽ?” हा प्रश्न चुकीचा नाही. उलट तो आत्मसन्मानातून निर्माण झालेला आहे. हजारो वर्षांच्या अपमानातून बाहेर पडलेल्या समाजाला पुन्हा त्या जुन्या जखमा आठवाव्यात. हे कुणालाही आवडणार नाही. पण प्रश्न एवढाच आहे की, आपण भावना आणि वास्तव यातील फरक समजून घेतो का? बौद्ध धम्मात जात नाही. हे शंभर टक्के सत्य आहे. तथागत बुद्धांनी मनुष्याला माणूस म्हणून पाहिले. त्यांनी कुणालाही उच्च-नीच मानले नाही. त्यांनी सांगितले “न जात्या ब्राह्मणो होति, न जात्या होति अब्राह्मणो.” म्हणजे जन्माने कुणी श्रेष्ठ किंवा कनिष्ठ होत नाही. ही मानवतेची सर्वोच्च घोषणा होती. पण भारतातील शासनव्यवस्था अजूनही जातीच्या आकडेवारीवर उभी आहे. हेही तितकेच कटू सत्य आहे.

भारतीय संविधानातील अनुच्छेद 341 अनुसूचित जातींची यादी निश्चित करतो. त्या यादीत महार आहे. बौद्ध नाही. पुढे धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातींचे अधिकार मिळावेत म्हणून कायद्यात बदल झाले. पण त्यासाठी मूळ जात अनुसूचित जातींच्या यादीत असणे आवश्यक ठेवण्यात आले. म्हणजे धर्म बौद्ध असला तरी जात महार ही घटनात्मक ओळख कायम राहते. ही व्यवस्था योग्य आहे की अयोग्य यावर मतभेद असू शकतात. हा वेगळा वाद असू शकतो. पण सध्या देशाचा कायदा याच पायावर उभा आहे. म्हणून जेव्हा एखादा तरुण केवळ भावनिक भूमिकेतून जात बौद्ध लिहितो, तेव्हा तो नकळत स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारतो. कारण शासन बौद्ध या धर्माला समता आणि आध्यात्मिक ओळख म्हणून पाहत असले. तरी आरक्षण, शिष्यवृत्ती, अत्याचार प्रतिबंधक कायदे आणि राजकीय प्रतिनिधित्व देताना जात तपासते. ही वस्तुस्थिती आहे. ती नाकारून चालत नाही. यातील सर्वात धोकादायक बाब म्हणजे आकडेवारी. शासन कोणत्याही समाजाकडे त्याच्या लोकसंख्येच्या आधारावर पाहते. जनगणना ही केवळ मोजणी नाही. ती भविष्यातील धोरणांची पायाभरणी आहे. जर लाखो लोकांनी आपल्या जातीच्या रकान्यात बौद्ध” लिहिले, तर सरकारी आकडेवारीत “महार” समाजाची संख्या कमी दिसेल. उद्या सरकार सहज म्हणेल, यांची संख्या कमी झाली आहे. मग आरक्षण, योजना, संरक्षण यांची गरज काय?” हा केवळ अंदाज नाही. इतिहासात अशा अनेक उदाहरणांनी हे सिद्ध केले आहे. आज खुल्या वर्गात जाती, जमाती, ओबीसीतील गुणवत्तांना नो एंट्री असे निर्णय घेतले जातात. त्यामुळे अधिक सावध असावे.

आजही अनेक राज्यांमध्ये धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातींच्या सवलतींसाठी न्यायालयीन लढे द्यावे लागतात. कारण व्यवस्थेची मानसिकता बदललेली नाही. गावागावात आजही एखाद्याला त्याच्या धर्माने नाही. तर जातीने हिणवले जाते. एखाद्या बौद्ध तरुणावर हल्ला झाला, तर हल्लेखोर त्याला “बौद्ध” म्हणून नव्हे, तर “महार” म्हणून लक्ष्य करतो. म्हणजे सामाजिक वास्तव अजूनही जातिवादीच आहे. अशा परिस्थितीत जात महार लिहिणे म्हणजे गुलामी स्वीकारणे नाही. उलट गुलामी विरोधातील घटनात्मक हत्यार जिवंत ठेवणे आहे. कारण आरक्षण ही भीक नाही. ती हजारो वर्षांच्या अन्यायाची भरपाई आहे. अत्याचार प्रतिबंधक कायदा ही




कृपा नाही. तो मानवी संरक्षणाचा कवच आहे. या कवचाशिवाय दलित-बौद्ध समाज पुन्हा असुरक्षित होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर करताना केवळ धर्म बदलला नाही. त्यांनी माणसाला आत्मसन्मान दिला. पण त्यांनी कधीही संविधानिक संरक्षण फेकून द्यायला सांगितले नाही. उलट त्यांनी संघर्षाला कायद्याची ताकद दिली. त्यांनी समतेच्या लढ्याला भावनांपेक्षा बुद्धीची दिशा दिली. आज काही लोक म्हणतात, जर आपण पुन्हा ‘महार’ लिहित राहिलो, तर जात कधीच संपणार नाही. हा विचार वरकरणी योग्य वाटतो. पण वास्तव वेगळे आहे. जात आपण लिहिल्याने टिकत नाही. ती सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेमुळे टिकते. एखादा माणूस स्वतःला मानव लिहू लागला म्हणून समाज त्याच्याकडे तसे पाहू लागणार नाही. उलट तो घटनात्मक संरक्षण गमावेल. समाजव्यवस्था बदलण्यासाठी प्रथम सत्ता लागते. सत्ता मिळवण्यासाठी संख्या लागते आणि संख्या सिद्ध करण्यासाठी आकडेवारी लागते. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी शिक्षण, संघटन आणि संघर्ष यांचा मार्ग दिला. त्यांनी भावनिक घोषणांपेक्षा संघटित शक्तीवर भर दिला. आज जर दलित-बौद्ध समाजाने स्वतःची लोकसंख्या, सामाजिक स्थिती आणि भोगलेले अन्याय यांची आकडेवारीच नष्ट केली. तर उद्याच्या पिढीला न्याय कशाच्या आधारावर मिळणार? याच ठिकाणी जात महार, धर्म बौद्ध या विधानाचा खरा अर्थ समजतो. हे विधान द्वेषाचे नाही. ते संघर्षाचे शस्त्र आहे. धर्माने आपण बुद्धांचे आहोत. आपण समतेचे, विज्ञाननिष्ठ विचारांचे आणि मानवतेचे अनुयायी आहोत. पण घटनात्मक हक्कांसाठी आपण अनुसूचित जातींच्या यादीतील समाज आहोत. ही दोन वास्तव एकाच वेळी अस्तित्वात आहेत. खरे तर भारतातील बहुजन समाजाचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे भावनिक दिशाभूल. अनेकदा लोकांना असे संदेश दिले जातात की जात लिहू नका, आपण मुक्त झालो. पण प्रश्न असा आहे की, केवळ कागदावरून जात पुसली म्हणून समाजातून जात पुसली जाते का? आजही विवाह जातीत होतात, गावांमध्ये स्मशाने वेगळी असतात, पाणवठे वेगळे असतात आणि अपमानही जातीवरूनच होतो. मग अशा वेळी फक्त नाव बदलून वास्तव बदलत नाही. याउलट, जर समाजाने आपली घटनात्मक ओळख टिकवून ठेवली, शिक्षण घेतले, राजकीय सत्ता मिळवली आणि संघटित संघर्ष केला. तर एक दिवस जातव्यवस्थेचा पूर्ण अंत शक्य आहे. पण त्यासाठी लढाईची साधने जिवंत ठेवावी लागतील. सैनिक युद्धभूमीवर स्वतःची ढाल फेकून देत नाही. तो विजय मिळेपर्यंत ती जपतो. त्याचप्रमाणे अनुसूचित जातींचे हक्क हे समाजाचे संरक्षण कवच आहेत. आजच्या तरुण पिढीने एक गोष्ट स्पष्ट समजून घेतली पाहिजे. आत्मसन्मान आणि आत्मघात यात फरक असतो. जात महार लिहिणे म्हणजे आत्मघात नाही. उलट पुढच्या पिढीला शिक्षण, नोकरी, प्रतिनिधित्व आणि न्याय मिळवून देण्याचा व्यवहार्य मार्ग आहे. जर उद्या एखाद्या गरीब बौद्ध विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती नाकारली गेली, तर त्याच्या डोळ्यातील अश्रूंना केवळ भावनिक घोषणांनी उत्तर मिळणार नाही. त्यासाठी कायदेशीर हक्क लागतील. त्यामुळे आजची गरज आहे ती संतुलित विचारांची. आपण बुद्धांच्या विचारांनी जगायचे हे खरे आहे. पण डॉ. बाबासाहेबांच्या दूरदृष्टीने लढायचे. धम्म आपल्याला माणूस बनवतो. संविधान आपल्याला संरक्षण देते. या दोन्हींपैकी एकही सोडून चालणार नाही. आज जनगणना, आरक्षण आणि सामाजिक न्याय याभोवती मोठा संघर्ष सुरू आहे. अशावेळी समाजाने भावनिक नव्हे, तर बौद्धिक निर्णय घ्यायला हवा. कारण एका चुकीच्या नोंदीमुळे पुढच्या अनेक पिढ्यांचे नुकसान होऊ शकते. इतिहासात ज्यांनी आपल्या अस्तित्वाची नोंद जपली. तेच समाज पुढे गेले. ज्यांनी भावनेत वास्तव नाकारले. ते इतिहासातून अदृश्य झाले. म्हणून आज प्रत्येक बौद्धाने हे लक्षात ठेवावे. आपण धर्माने बौद्ध आहोत. पण सामाजिक न्यायाच्या लढ्यात संविधानाने दिलेले कवचही आपले आहे. महार ही शिवी नाही; ती हजारो वर्षांच्या अन्यायाची साक्ष आहे. त्याच अन्याया विरुद्ध मिळालेल्या अधिकारांची घटनात्मक नोंद आहे. जात संपवायची असेल, तर प्र थम समाजाला शिक्षित करावे लागेल. संघटित करावे लागेल. सत्तेच्या केंद्रात पोहोचवावे लागेल. त्या दिवशी कदाचित खऱ्या अर्थाने जात नष्ट होईल. पण तोपर्यंत आपल्या हक्कांची ढाल जपणे हीच शहाणपणाची भूमिका आहे.

म्हणूनच आजचा संदेश स्पष्ट आहे. धर्माच्या रकान्यात अभिमानाने बौद्ध लिहा. जातीच्या रकान्यात वास्तव समजून महार लिहा. कारण बुद्धांनी आपल्याला स्वाभिमान दिला आणि डॉ. बाबासाहेबांनी त्या स्वाभिमानाला संविधानिक संरक्षण दिले. ही दोन्ही वारसा जपणे, हीच आजच्या पिढीची खरी जबाबदारी आहे.●●

**– आ. राजकुमार बडोले**
माजी सामाजिक न्यायमंत्री

# साहित्य समीक्षा आणि समाज चिंतन

## डॉ. प्रकाश खरात यांच्या समग्र साहित्यविश्वाचा वैचारिक गौरव

स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या संविधानिक मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून निर्माण झालेले साहित्य म्हणजे आंबेडकरी साहित्य होय. १९५६ च्या धम्मांतर चळवळीनंतर या साहित्य प्रवाहाला नवी दिशा मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन वंचित, शोषित आणि अस्पृश्य समाजाने आपल्या वेदना, संघर्ष आणि अस्तित्वाची जाणीव शब्दांमधून व्यक्त करण्यास सुरुवात केली. गावकुसाबाहेरील उपेक्षित जीवनाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणण्याचे मोठे कार्य आंबेडकरी साहित्याने केले. या साहित्य प्रवाहात दुसऱ्या पिढीतील प्रभावी साहित्यिक, समीक्षक, कथाकार, कवी आणि विचारवंत म्हणून प्रा. डॉ. प्रकाश ओंकार खरात यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांच्या समग्र साहित्य कार्याचा सखोल आढावा घेणारा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बहुआयामी परिचय करून देणारा ‘साहित्य समीक्षा आणि समाज चिंतन : डॉ. प्रकाश खरात गौरव समीक्षा ग्रंथ’ हा अत्यंत महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ ठरला आहे. या ग्रंथाचे संपादन प्रा. डॉ. रूपेश नरहरी कऱ्हाडे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक आणि वैचारिक निष्ठेने केले आहे. या ग्रंथाला २०२६ मध्ये तीन महत्त्वाचे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले असून, त्यामध्ये शब्दांगण उत्कृष्ट समीक्षा ग्रंथ पुरस्कार, मराठी साहित्य संवर्धन बहुउद्देशीय संस्था, उमरखेड पुरस्कार आणि आशादीप उत्कृष्ट समीक्षा ग्रंथ पुरस्कार, भुसावळ यांचा समावेश आहे. गौरव ग्रंथ ही मराठी साहित्य परंपरेतील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. एखाद्या साहित्यिकाच्या कार्याचे मूल्यमापन, त्याच्या साहित्य प्रवासाचा आढावा आणि सामाजिक योगदानाचे विश्लेषण या माध्यमातून केले जाते. या ग्रंथातून डॉ. प्रकाश खरात यांच्या साहित्य निर्मितीमागील वैचारिक अधिष्ठान, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनवादी भूमिका स्पष्टपणे समोर येते.




डॉ. यशवंत मनोहर यांनी या ग्रंथाच्या प्रारंभी लिहिलेला लेख विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी साहित्य हे समाजावरील भाष्य असल्याचे सांगताना वैदिक आणि यथास्थितीवादी साहित्य दृष्टिकोनावर कठोर टीका केली आहे. “साहित्याने जीवन जसे आहे तसेच मांडावे, त्याची चिकित्सा करू नये,” या प्रस्थापित भूमिकेला त्यांनी विरोध दर्शविला. त्यांच्या मते, साहित्य हे अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध बोलणारे माध्यम आहे. डॉ. प्रकाश खरात यांच्या साहित्याची प्रेरणा बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या तत्वज्ञानातून आलेली असल्याचे ते नमूद करतात. डॉ. वसंत शेंडे यांनी “डॉ. प्रकाश खरात यांची समीक्षा दृष्टी” या लेखातून खरात यांच्या वैचारिक लेखनाचे मूल्यमापन केले आहे. दलित साहित्याने मराठी समीक्षेचे मापदंड बदलले, सामाजिकता आणि जीवनवादाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणले, असे ते सांगतात. खरात यांच्या समीक्षेत विज्ञाननिष्ठा, परिवर्तनवाद आणि मानवी मूल्यांची जाणीव प्रकर्षाने दिसून येते. प्रमोद वाळके यांनी “प्रज्ञानाचा वेलू” या लेखातून डॉ. खरात यांच्या साहित्यिक प्रतिभेचे गौरवपूर्ण वर्णन केले आहे. त्यांच्या मते, खरात यांच्या लेखनात सामाजिक वास्तव, भाषिक सौंदर्य आणि वैचारिक स्पष्टता यांचा सुंदर संगम दिसतो. त्यांच्या साहित्यकृती केवळ वाचनाचा आनंद देत नाहीत, तर समाजपरिवर्तनाची प्रेरणाही देतात. प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी “मराठी साहित्य प्रवाहाचे चिंतन” या लेखातून डॉ. खरात यांच्या ‘मराठी साहित्य : प्रवाह आणि समीक्षा’ या ग्रंथातील लेखांचे विश्लेषण केले आहे. साठोत्तरी आंबेडकरी साहित्य प्रवाहाला त्यांनी दिलेली वैचारिक दिशा आणि समीक्षात्मक भूमिका विशेष महत्त्वाची असल्याचे ते नमूद करतात.

डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी “डॉ. प्रकाश खरात यांची साहित्य समीक्षा” या लेखात अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात आणि बाबुराव बागुल यांच्या साहित्य परंपरेचा संदर्भ देत डॉ. खरात यांच्या समीक्षेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आंबेडकरवादी साहित्याचे वेगळेपण आणि त्यामागील सामाजिक संघर्ष त्यांनी प्रभावीपणे उलगडून दाखवले असल्याचे ते म्हणतात. या गौरव ग्रंथातील अनेक लेख डॉ. प्रकाश खरात यांच्या विविध साहित्य प्रकारांतील योगदानावर प्रकाश टाकतात. कथाकार, कादंबरीकार, स्तंभलेखक, समीक्षक, कवी आणि विचारवंत म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचे विविध अभ्यासकांनी विश्लेषण केले आहे. भूपेंद्र गणवीर यांनी त्यांना प्रभावी स्तंभकार म्हणून गौरविले आहे, तर डॉ. आशा अंबोरे यांनी त्यांच्या ललित वाङ्मयातील प्रतिमाविश्वाचे सखोल विश्लेषण केले आहे.

विशेषतः ‘यशोधरा’ ही त्यांची कादंबरी अनेक अभ्यासकांच्या चर्चेचा विषय ठरली आहे. प्रा. आत्माराम गोडबोले यांनी या कादंबरीला “विश्वस्पर्शी कादंबरी” असे संबोधले आहे. तथागत बुद्ध आणि यशोधरा यांच्या जीवनातील भावविश्व, त्याग आणि मानवी संघर्ष अत्यंत संवेदनशीलतेने या कादंबरीत व्यक्त झाला असल्याचे ते नमूद करतात. डॉ. युवराज सोनटक्के यांनी या कादंबरीचा हिंदी अनुवाद का केला, याचेही सविस्तर विवेचन केले आहे.

डॉ. अनिल गजभिये यांनी “मराठी दलित कथेचा समीक्षक : डॉ. प्रकाश खरात” या लेखातून त्यांच्या व्यासंगी वृत्तीचे कौतुक केले आहे. त्यांनी केलेले अफाट वाचन, शेकडो कथांची चिकित्सक तपासणी आणि स्वतंत्र समीक्षा दृष्टी यांचा विशेष उल्लेख त्यांनी केला आहे. त्यांच्या लेखणीतील उपरोध, चिकित्सक वृत्ती आणि सामाजिक भान परिवर्तनवादी साहित्याला नवी दिशा देणारे असल्याचे ते सांगतात.

डॉ. मच्छिंद्र चोरमारे यांनी “साहित्यातून चळवळीला ऊर्जा देणारा लेखक” या शब्दांत खरात यांचा गौरव केला आहे. त्यांच्या भाषणशैलीने आणि लेखनाने अनेकांना वैचारिक प्रेरणा दिली असल्याचे ते नमूद करतात. सामाजिक चळवळीशी एकरूप झालेला साहित्यिक म्हणून त्यांची ओळख अधिक ठळकपणे समोर येते. या ग्रंथातील अनेक लेखांतून डॉ. प्रकाश खरात यांच्या व्यक्तिमत्त्वातील माणूसपण, मैत्रीभाव, सामाजिक जाणीव आणि प्रामाणिकपणा यांचे दर्शन घडते. अरुणा सबाने यांनी त्यांना “निर्मळ मनाचा मित्र” म्हटले आहे, तर डॉ. राजेंद्र वाटाणे यांनी “अजातशत्रू” अशी उपमा दिली आहे. त्यांच्या कवितांमधील विद्रोह, सामाजिक वास्तव आणि आत्मभान यांचे दर्शन घडविणाऱ्या काही ओळी विशेष लक्षवेधी आहेत :

“आपणच असतो आपल्या
भल्या बुऱ्या जगण्याचे उद्धारक
स्वतःलाच करायचे असते
आपल्या चांगल्या वाईट जीवनाचे वाहक...”

या ओळी माणसाला आत्मपरीक्षणाची प्रेरणा देतात. परंपरेच्या नावाखाली माणसाला जखडून ठेवणाऱ्या व्यवस्थेविरोधातील त्यांचा विद्रोह येथे स्पष्टपणे दिसतो. या गौरव ग्रंथाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील विविध लेखक, समीक्षक आणि साहित्यिकांनी केलेले बहुआयामी मूल्यमापन. महाराष्ट्रासह कर्नाटक, मध्यप्रदेश अशा विविध भागांतील अभ्यासकांनी या ग्रंथात सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे हा ग्रंथ केवळ गौरवग्रंथ राहत नाही, तर आंबेडकरी साहित्य आणि समाजचिंतनाचा व्यापक दस्तऐवज बनतो.

ग्रंथाच्या शेवटी डॉ. रूपेश कऱ्हाडे यांनी घेतलेली डॉ. प्रकाश खरात यांची मुलाखत अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यातून त्यांच्या जीवनसंघर्षाचा, साहित्यप्रवासाचा आणि वैचारिक भूमिकेचा परिचय होतो. तसेच ग्रंथातील छायाचित्रे, पत्रे आणि मानपत्रे यामुळे हा ग्रंथ अधिक दस्तऐवजी स्वरूपाचा वाटतो. एकूणच ‘साहित्य समीक्षा आणि समाज चिंतन : डॉ. प्रकाश खरात गौरव समीक्षा ग्रंथ’ हा आंबेडकरी साहित्य परंपरेतील अत्यंत महत्त्वाचा, अभ्यासपूर्ण आणि संदर्भमूल्य असलेला ग्रंथ आहे. साहित्य, समाज आणि परिवर्तनवादी विचार यांच्यातील संबंध समजून घेण्यासाठी हा ग्रंथ अभ्यासक, संशोधक आणि वाचकांसाठी दिशादर्शक ठरतो. डॉ. प्रकाश खरात यांच्या साहित्य आणि विचारविश्वाचा समग्र परिचय करून देणारा हा ग्रंथ मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वपूर्ण वैचारिक दस्तऐवज म्हणून दीर्घकाळ स्मरणात राहील.●●

गौरव समीक्षा ग्रंथाचे नाव - साहित्य समीक्षा आणि समाज चिंतन : डॉ. प्रकाश खरात गौरव समीक्षा ग्रंथ
**संपादक : डॉ. रूपेश नरहरी कऱ्हाडे**
संपादक मंडळ : प्रा. रचना प्रकाश खरात
प्रा. डॉ. गोल्डी किशोर जांभूळकर
संकेत प्रकाशन नागपूर,
१४ ऑक्टो.२०२४
मूल्य : ४५० ₹
संपादक संपर्क - ९६८९५२९०७०

# उपवर्गीकरण आणि बौद्ध मातंग मतभेद

सध्या अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण आणि जातनिहाय जनगणना हे दोन विषय देशभर चर्चेत आहेत. विशेषतः उपवर्गीकरणाचा प्रश्न महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सामाजिक आणि राजकीय वादाचा विषय बनला आहे. अनुसूचित जातींमध्ये महाराष्ट्रात ५९ जातींचा समावेश आहे. आरक्षणाचा लाभ काही मोजक्याच जातींना, विशेषतः बौद्ध समाजाला अधिक प्रमाणात मिळाला, असा आरोप काही घटकांकडून केला जात आहे. त्यात मातंग समाजातील काही संघटना उपवर्गीकरणाची जोरदार मागणी करत आहेत, तर बौद्ध समाज त्याला विरोध करीत आहे. त्यामुळे बौद्ध विरुद्ध मातंग असा तणाव निर्माण होत असल्याचे चित्र दिसते. मात्र या प्रश्नाकडे केवळ भावनिक किंवा जातीय दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही. त्यामागील सामाजिक, ऐतिहासिक, शैक्षणिक आणि राजकीय वास्तव समजून घेणे आवश्यक आहे.

**उपवर्गीकरण म्हणजे काय?**

अनुसूचित जातींमध्ये काही जाती अधिक प्रगत झाल्या असून काही मागे राहिल्या आहेत, असा युक्तिवाद करून आरक्षणाचे स्वतंत्र वाटप करावे, ही उपवर्गीकरणाची मूलभूत संकल्पना आहे. यामध्ये अनुसूचित जातींना वेगवेगळ्या गटात विभागून त्या गटांना स्वतंत्र टक्केवारी देण्याची चर्चा सुरू आहे. परंतु प्रत्यक्षात कोणत्या जाती कोणत्या गटात जातील, कोणाला किती टक्के आरक्षण मिळेल, त्याची अंमलबजावणी कशी होईल, याबाबत अद्याप स्पष्ट धोरण समोर आलेले नाही. त्यामुळे सध्या अनेक चर्चा या केवळ अंदाज आणि राजकीय प्रचाराच्या स्वरूपात दिसतात.

**मातंग समाजाची मागणी :** महाराष्ट्रात मातंग समाजाने स्वतंत्र आरक्षणाची मागणी अनेक वर्षांपासून केली आहे. काही मातंग नेत्यांचे मत असे आहे की, शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये बौद्ध समाज तुलनेने पुढे गेला, तर मातंग समाज मागे राहिला. त्यामुळे आरक्षणामध्ये स्वतंत्र हिस्सा मिळाल्यास मातंग समाजाला न्याय मिळू शकेल. ही मागणी केवळ सामाजिक नाही, तर राजकीय स्वरूपाचीही आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात विविध पक्षांनी मातंग समाजाला आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे उपवर्गीकरणाचा प्रश्न हा सामाजिक न्यायाइतकाच राजकीय गणिताचाही भाग बनला आहे.

**बौद्ध समाजाचा विरोध का? :** बौद्ध समाजाचा मोठा भाग उपवर्गीकरणाला विरोध करतो. कारण त्यांच्या मते हा प्रश्न सामाजिक न्यायापेक्षा दलित समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व अस्पृश्य समाजाला समान हक्क मिळावेत म्हणून संघर्ष केला. त्यामुळे दलित समाजाची एकजूट तुटू नये, असे अनेक आंबेडकरी विचारवंतांचे मत आहे. बौद्ध समाजाने शिक्षण, संघटन आणि संघर्ष यांच्या माध्यमातून प्रगती साधली. त्यांनी पारंपरिक गुलामगिरीची कामे सोडून शिक्षणाला प्राधान्य दिले. शहरांकडे स्थलांतर केले, मुलांना शिकवले आणि कठोर परिश्रमातून पात्रता मिळवली. त्यामुळे त्यांना आरक्षणाचा तुलनेने अधिक लाभ मिळाला. मात्र याचा अर्थ असा नाही की इतर समाजांचा हक्क हिरावून घेतला गेला. आरक्षण हे पात्रतेच्या आधारे मिळते. ज्यांच्याकडे शिक्षण आणि स्पर्धात्मक तयारी आहे, त्यांनाच त्याचा लाभ अधिक मिळतो. शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी “शिका, संघटित व्हा, संघर्ष करा” हा संदेश दिला. या संदेशाचा स्वीकार ज्या समाजघटकांनी केला, ते पुढे गेले. बौद्ध समाजातील अनेक कुटुंबांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाला महत्त्व दिले.



**लेखांक 156**
**अशोक सरस्वती बोधी**
मो. 8530980741

मातंग समाजातील काही प्रगत घटकांनीही हा मार्ग स्वीकारला आणि तेही शिक्षण, नोकरी व सामाजिक क्षेत्रात पुढे आले. आज अनेक मातंग अधिकारी, प्राध्यापक, वकील आणि सामाजिक कार्यकर्ते उल्लेखनीय काम करीत आहेत.

मात्र अजूनही मोठा समाज शिक्षणापासून दूर आहे. त्याला ऐतिहासिक गरिबी, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, सामाजिक दबाव आणि योग्य नेतृत्वाचा अभाव ही कारणे आहेत. या समस्यांचे निराकरण केवळ उपवर्गीकरणाने होणार नाही. राजकारण आणि सामाजिक विभाजन भारतीय राजकारणात जात हा महत्त्वाचा घटक राहिला आहे. विविध राजकीय पक्ष आपापल्या फायद्यासाठी जातीय प्रश्नांना हवा देत असतात. उपवर्गीकरणाच्या प्रश्नातही हेच दिसून येते. दलित समाज एकत्र राहिला तर तो मोठी सामाजिक आणि राजकीय शक्ती बनू शकतो. त्यामुळे त्यांच्यात मतभेद निर्माण करणे हे काही शक्तींना सोयीचे वाटते. बौद्ध विरुद्ध मातंग असा संघर्ष उभा राहिल्यास त्याचा लाभ राजकीय पक्षांना होतो; मात्र नुकसान संपूर्ण वंचित समाजाचे होते. आज सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण कमी होत आहे. खासगीकरण वाढत आहे. अनेक सार्वजनिक संस्था बंद पडत आहेत. अशा परिस्थितीत आरक्षणाच्या उपलब्ध संधी आधीच कमी झाल्या आहेत. त्यामुळे दलित समाजाने एकमेकांविरुद्ध संघर्ष करण्याऐवजी शिक्षण, रोजगार, उद्योग आणि सामाजिक संघटन यावर भर देणे अधिक आवश्यक आहे. अघोषित उपवर्गीकरण प्रत्यक्षात समाजात एक प्रकारचे अघोषित उपवर्गीकरण आधीपासूनच अस्तित्वात असल्याचे अनेकांचे मत आहे. काही क्षेत्रांत विशिष्ट जातींना प्राधान्य दिले जाते, तर काही जातींकडे दुर्लक्ष होते. सामाजिक संपर्क, आर्थिक स्थिती आणि स्थानिक प्रभाव यावरही संधी अवलंबून असतात. मात्र या वास्तवामुळे अधिक विभाजन करणे योग्य ठरत नाही. उलट सर्व समाजघटकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देणे अधिक महत्त्वाचे आहे.




**आंबेडकरी चळवळीची जबाबदारी :** आंबेडकरी चळवळीने केवळ एका समाजापुरते मर्यादित न राहता सर्व वंचित घटकांमध्ये काम केले पाहिजे. अनेक ठिकाणी बौद्ध कार्यकर्त्यांनी मातंग, भंगी, खाटिक आणि इतर समाजात जाऊन प्रबोधनाचे कार्य केले आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तन घडले आहे. समाजात करुणा, बंधुता आणि संवाद वाढवणे ही आजची मोठी गरज आहे. द्वेषातून कोणताही प्रश्न सुटत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेवर आधारित आहे. त्यामुळे दलित समाजातील अंतर्गत संघर्ष टाळणे आवश्यक आहे. उपवर्गीकरणाचा प्रश्न अत्यंत संवेदनशील आहे. त्यावर चर्चा होणे आवश्यक असले तरी ती परस्पर द्वेष, आरोप आणि संघर्षावर आधारित नसावी. कोणताही समाज शत्रू नाही. सर्व वंचित समाजघटक हे इतिहासातील अन्यायाचे बळी आहेत. समाजाला पुढे न्यायचे असेल तर शिक्षण, संघटन, वैचारिक प्रबोधन आणि आर्थिक स्वावलंबन या मार्गाने जावे लागेल. दलित समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न ओळखून त्याला बुद्धिमत्तेने उत्तर देणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला समतेचा संदेश हा सर्वांसाठी आहे. त्यामुळे संघर्षाऐवजी संवाद, द्वेषाऐवजी करुणा आणि विभाजनाऐवजी एकजूट हा मार्ग स्वीकारणेच समाजहिताचे ठरेल.●●

## जनतेने त्याग करावे?

वाह रे जनता राज, धर्माचा करुनी धुवा जनतेच्या त्रासाला केले हवा ..
तुमच्या ताटातले तेल करूनी बंद थाळी वाजवत चला, होऊन बेधुंद.. १..
भावांनो आर्थिक तंगी येत आहे घरूनच काम करावे मेट्रो तुमच्यासाठी आहे पेट्रोल वाचवा,
जनता पैदल चालत आहे सोण घेऊ नका, झराळी खोटी आहे... २....
निवडणूक संपली भाव वाढ झाली तुम्ही, विदेश यात्रा करू नका ..
माझी सात देशात फेरी झाली विकासाचा हाच रस्ता विसरू नका..3...
घरूनच काम करावे, ऊर्जा वाचवा तुम्हा आव्हान करतो देश वाचवा देश
वासीयांनो डोळे उघडून पहा जरा तुमचा विकास कुठवर झाला पहा जरा.. ४...
सामान्य जनतेला जात्यात भरडावे कायम हात फैलावनारे व लाचार करावे..
पण श्रीमंतांना दोन्ही हाताने भरभरून द्यावे हीच आहे का प्रगती व विकास कोणा पुसावे ...५...

**इंजि. शुद्धोधन बडवने**

## ऋणानुबंध



नव्हती ओळख साधी, माझी तुझ्याशी,
का? जिवलग झाली मैत्री, माझी तुझ्याशी ।।
संबंध रक्ताचा, नव्हता तुझा नी माझा,
का? जुळली नाळ, तुझी माझ्याशी ।।
बघता तुला एकदाच, मी त्या दिवशी,
ओढला गेलो का...मी जवळी तुझ्याशी ।।
नाही करमत मला तुजविण जराही,
का? एवढा गुंतलो, अलगद तुझ्याशी ।।
ऋणानुबंध आपुले, असावे पूर्व जन्मीचे,
झाली म्हणूनच भेट, माझी तुझ्याशी ।।

**चंद्रकांत सावळकर**

## काव्यफुले



संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

बहुजन सौरभ

## ब्राह्मण्य

आरक्षणाने उच्च पदावर विराजमान
मिरवतात समजुन ते स्वतःला गुणवान
उच्च पदामुळे ते बनतात समाजाचे भुषण
समाजात राहुन करतात समाजाचे नुकसान
बाबासाहेब बुध्दाची पुस्तके ते नाही वाचत
पुरावे दिले तरी परके विचार नाही सोडत
संघाचे विचाराने ते आधीच ब्रेनवाश झाले
आता आपला ब्रेनवाश करण्यास निघाले
लग्न सभारंभाला येते समाजाची आठवण
इतर समाज त्यांना जवळ घेत नाही हे कारण
अशा ब्राह्मण्य लोकांचा अंत मी पाहीला
चार माणस सुध्दा येत नाही अंतविधीला

**इंजि.नरेंद्र ताकसांडे**

## महान कवी वामन दादा कर्डक

अफाट विचार धनाचे बादशहा
वामनदादा कर्डक होते ।
डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे सतत
विचार पेरत होते ।
तमा न केली कधीही कोणाची
तलवारी ची धार होती पेनाची ।
मांडली वेदना शोषित, वंचितची
जाणीव दिलीकरून स्वत्वाची ।
जनभाषा माध्यम कवितेचे
सजले होते अलंकार झूलेचे ।
शस्त्र स्वीकारले शील करुणेचे
सिंचित केले विचार बुद्धाचे ।
सोडली न साथ बुद्ध नी बाबांची
तेवत ठेवली वात सदैव त्यांची ।
ना रडला ना झुकला कोणापाठी
ताठ मानेने जगला बाबासाठी
नव्हता तो शिक्षक नि प्राध्यापक
संशोधन केले त्यांच्या कवितेवर।
झाले कित्येक कवी अवनीवर
येईल काहो वामनदादाची सर?

**डॉ. एम. एस. शाक्य जांभुळे**

## गुंता फुलांचा

गुंता हा फुलांचा
हळवा अधिक झाला
काही केल्या सुटेना
सुगंध बहरत गेला
भयरात्र होती काळी
दुःखाचे पांघरूण होते
काही केल्या संपेना
काट्यांचे करार होते
खणतीत आज माझ्या
झरे थोडेसे लागले
पाहूनी मज तृप्त
काटेही जळू लागले
फुलांची देखणी बाग
सुखांची बरसात होती
तोडूनी जाळ काट्यांचे
माणसं जोडत होती
भय आता ना काही
गुंता सहज सुटला
हळव्या मनाशी जेव्हा
काळीज संवाद झाला

**महेंद्रकुमार मेश्राम**

## शब्दशिल्पकार- वामन दादा



शब्दशिल्पकार -
वामन दादा
वादळांशी वादा
विचारांशी खंदा,
कलदार बंदा होता
माझा वामन दादा !!
लेखणीचा दर्जा,
नित्य पेरी ऊर्जा,
तुझ्या मुळे घरोघरी रुजला भीम माझा,
लुले ज्योत झाले, मुके गात आले,
संघर्षांचा खांदा होता माझा वामन दादा....
मनुवादी अस्त्र, प्रजा सारी त्रस्त,
तुझे गीत झाले जसे,चळवळीचे शस्त्र,
तू शब्दशिल्पकार ,मुक नायकाची धार ,
वादळी इरादा होता माझा वामन दादा....
तूच महाकवी तू अढळ तारा,
हळहळला तुझ्यासाठी, आसमंत सारा,
प्रज्वलित आस्था,तू बुद्धाची गाथा,
चित्ताची श्रद्धा होता माझा वामन दादा ..
कलदार बंदा होता माझा वामन दादा.

**चित्तरंजन चौरे**

## सावित्रीची ज्योत



ज्ञानदीप घेऊनी हाती,
निघाली एक क्रांती,
अंधाराच्या वाटेवरती,
उजळली मानवजाती।।धृ ।।
ममतेची गंगा वाहुनी,
विद्येची कास घेई,
शोषितांच्या वेदनांना,
शब्दांनी आधार देई ।।१।।
दगडांच्या जखमा लेवूनी,
विद्यादानास ती गेली,
गोबर गंधात जरी ती,
पिढी सत्यगंधात उभी केली ।।२।।
जात-पातच्या मोडून भिंती,
समतामूलक जागविला,
स्त्री शिक्षणाची पेटवून ज्योत,
नवभारत घडविला ।।३।।
शिक्षण स्त्रीमुक्तीचे शस्त्र,
अन स्वाभिमानाची ज्योत आहे,
अज्ञानाच्या तिमिरातील,
इंद्रधनुषी पोत आहे ।।४।।
विधवांचे पुसूनी अश्रू,
दिली मायाळू सावली,
मानवतेच्या प्रेमापोटी,
'प्लेग' धरूनी धावली।।५।।
त्याग मूर्तीच्या स्मृतीमधूनी,
प्रेरणेची फुले फुलती,
मानवतेच्या श्वासातूनी,
सावित्रीची ज्योत जळती ।।६।।
चला धरूया ज्ञानध्वजा,
अन्यायाशी युद्ध करू,
सावित्रीच्या कर्मज्योतीने,
समाज नवा प्रणये घडवू ।।७।।

**इंजि. विजय चव्हाण**

## भान

दुसऱ्यांना सांगताना
थोडेतरी भान असू द्यावे
विसर पडू देऊ नये त्याचा
तसेच जगायला शिकावे
काही लोक आठवण ठेवतात
काहीजण विसरून जातात
पण,बोललेले शब्द मिटत नाही
मनातल्या मनात, टोचत असतात
बोलावे मनमोकळ्यापणाने
आपुलकीने संवाद साधावा
भान कायम असू द्यावे
सर्वांना सारखे समजावा
माणूस आज आहे उद्या नाही
कोणाचे मन कधीच दुखावू नये
कोणीच काही घेऊन जात नाही
कोणाला तुच्छ लेखू नये
शब्द असतात शस्त्रासारखे
कोणाला वेदना देऊन जातात
बोलताना विचार करून बोलावा
बोललेले शब्द आठवीत राहतात

**संगीता संतोष ठलाल**

# क्रांतीचा हुंकार आणि महामानवाप्रती कृतज्ञतेचा स्वर : ‘सूर्याचा सूर्य’




मराठी साहित्याच्या प्रांतात जेव्हा परिवर्तनाची आणि सामाजिक न्यायाची भाषा येते, तेव्हा काही काव्यसंग्रह केवळ साहित्यकृती राहत नाहीत, तर ते एका चळवळीचे वैचारिक दस्तऐवज बनतात. कवयित्री मनीषा आनंदराव कांबळे (आनंदकन्या) यांचा ‘सूर्याचा सूर्य’ हा काव्यसंग्रह अशाच प्रकारचा एक विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी कवितासंग्रह आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचारांना शब्दरूप देणाऱ्या या संग्रहातील प्रत्येक कविता आत्मसन्मान, समता, बंधुता आणि संघर्षाचा दीप प्रज्वलित करणारी आहे. या काव्यसंग्रहातील ‘आम्ही निघालो’ ही कविता विशेषत्वाने लक्ष वेधून घेते. ही कविता केवळ शब्दांची रचना नाही, तर ती सामाजिक परिवर्तनासाठी कटिबद्ध असलेल्या भीमसैनिकांच्या सामूहिक जाणीवेचा आणि निर्धाराचा आवाज आहे. “आम्ही निघालो, भीमाचे पाईक आम्ही” या ओळींमधून कवयित्रीने बाबासाहेबांच्या विचारांशी असलेले नाते अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे. येथे ‘पाईक’ हा शब्द केवळ अनुयायांचा अर्थ देत नाही, तर परिवर्तनाची धुरा खांद्यावर घेऊन समाजाला नव्या दिशेने नेणाऱ्या योद्ध्यांचे प्रतीक बनतो. कवितेतील “स्वयं प्रकाशित करूनी समाज सारा” ही कल्पना विशेष आशयगर्भ आहे. कवयित्री येथे आत्मजागृतीचा संदेश देते. समाजाने इतरांच्या प्रकाशाची वाट न पाहता स्वतः ज्ञानाचा दीप व्हावे, हा विचार बाबासाहेबांच्या प्रबोधनवादी तत्त्वज्ञानाशी एकरूप होतो. हे पाईक समाजाला अंधारातून बाहेर काढण्याचे कार्य करत आहेत. म्हणूनच कवितेत आत्मविश्वास, स्वाभिमान आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम दिसून येतो. “प्रयत्नांची पराकाष्टा करीत, पराक्रमाचे निखारे फुलवीत” या ओळींतून संघर्षशील वृत्तीचे दर्शन घडते. सामाजिक परिवर्तन केवळ विचारांनी घडत नाही; त्यासाठी जिद्द, त्याग आणि संघर्षाची तयारी आवश्यक असते. कवयित्रीने या ओळींमधून परिवर्तनवादी चळवळीचा धगधगता आत्मा पकडला आहे. “जिद्दीने पेटून” ही भावना संपूर्ण कवितेत ऊर्जा निर्माण करते. कवितेचा शेवट “त्या निळ्या-निळ्या बोधिवृक्षाच्या सावलीत” या प्रतिमेने होतो. येथे ‘निळा बोधिवृक्ष’ हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा, ज्ञानाचा आणि समतेच्या तत्त्वज्ञानाचा प्रतीकात्मक विस्तार आहे. बौद्ध तत्त्वज्ञानातील बोधिवृक्ष मुक्ती आणि ज्ञानाचे प्रतीक मानला जातो. कवयित्रीने त्याला ‘निळा’ रंग देऊन आंबेडकरी चळवळीच्या विचारविश्वाशी जोडले आहे. “जहरी ऊन” हे सामाजिक विषमता, अन्याय, अस्पृश्यता आणि शोषणाचे प्रतीक बनते. त्या विषारी वास्तवापासून वाचण्यासाठी बाबासाहेबांचे विचारच आश्रयस्थान ठरतात, हा संदेश कविता प्रभावीपणे देते.‘सूर्याचा सूर्य’ या काव्यसंग्रहाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्यातील प्रत्येक कविता एका व्यापक सामाजिक जाणिवेने भारलेली आहे. वादळ, दिशादर्शक, क्रांतिवीर भीमराया, आठवण, भीम, प्राण अशा कवितांमधून बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची महती व्यक्त होते. ‘आनंदाश्रू’ या कवितेत कवयित्रीने बाबासाहेबांशी साधलेला भावनिक संवाद अंतर्मुख करणारा आहे. तर ‘हरवलेला माणूस आता बौद्ध विहारात सापडेल’ या आशयातून समाजाला नवी दिशा मिळण्याची आशा व्यक्त होते. दीक्षाभूमीच्या संदर्भातील कवितांमध्ये कवयित्रीने प्रज्ञा, करुणा आणि माणुसकीचे सौंदर्य अत्यंत सुंदर शब्दांत रंगवले आहे. दीक्षाभूमी ही केवळ वास्तू नसून ती आत्मिक शांती, समृद्धी आणि सामाजिक पुनर्जन्माचे केंद्र आहे, अशी भावना त्यांच्या कवितांतून व्यक्त होते. खैरलांजी हत्याकांडासारख्या वेदनादायी घटनांचे दुःखही त्यांच्या कवितेतून प्रकर्षाने व्यक्त होते. मात्र हे दुःख केवळ आक्रोश बनून राहत नाही; ते संघटित होण्याचे, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे आणि भीमाच्या लेकरांनी एका विचारमंचाखाली एकत्र येण्याचे आवाहन बनते. म्हणूनच त्यांच्या कवितेत वेदनेसोबत संघर्षाची जिद्दही आहे. कवयित्रीची शैली अत्यंत थेट, स्पष्ट आणि प्रभावी आहे. त्या क्लिष्ट अलंकारिकतेपेक्षा साध्या पण परिणामकारक शब्दांत विचार मांडतात. “क्रांतीची धुरा”, “पराक्रमाचे निखारे”, “जहरी ऊन”, “निळा बोधिवृक्ष” यांसारखी प्रतीके त्यांच्या कवितेला वैचारिक आणि कलात्मक गहिरेपणा देतात. ‘सूर्य’ हे प्रतीक संपूर्ण संग्रहात ज्ञान, प्रबोधन आणि क्रांतीचा केंद्रबिंदू म्हणून उभे राहते.‘सूर्याचा सूर्य’ या शीर्षकातच कवयित्रीची वैचारिक भूमिका स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी “क्रांतीसूर्य” म्हणून वंदन केले आहे. अर्पणपत्रिकेतील “तेजोवलयाने दाही दिशा उजळून टाकणाऱ्या क्रांतीसुर्यास” हा उल्लेख त्यांच्या निष्ठेची साक्ष देतो. विशेष म्हणजे हा काव्यसंग्रह १४ एप्रिल २००९ या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी प्रकाशित झाला. ही तारीख निव्वळ योगायोग नसून विचारांना अभिवादन करण्याची जाणीवपूर्वक निवड आहे.या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठही अत्यंत आशयसंपन्न आहे. आदरणीय बळी खैर यांनी साकारलेल्या मुखपृष्ठावर लाल रंगात झळकणारे ‘सूर्याचा सूर्य’ हे शीर्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रभावी चित्र आणि पिंपळाच्या पानावर रेखाटलेला लाल-पिवळसर सूर्य, हे सर्व एकत्रितपणे क्रांती, ज्ञान आणि जागृतीचा संदेश देतात. मुखपृष्ठ पाहताच वाचकाला हा संग्रह एका वैचारिक ऊर्जेचा दस्तऐवज असल्याची जाणीव होते. कवयित्रीच्या मनोगतातून त्यांचा विनम्र आणि संवेदनशील स्वभाव जाणवतो. “मनस्वी आनंद शब्दबंधिस्त करणे अशक्य आहे” असे त्या म्हणतात, आणि हाच त्यांच्या लेखनातील प्रामाणिकपणाचा गाभा आहे. त्यांनी आपल्या साहित्यप्रवासात साथ देणाऱ्या डॉ. सुभाष जमधाडे, श्री. दशरथ मडावी, प्रमिला उमरेडकर, डॉ. नरेंद्र भगत, प्रा. सुनंदा वालदे, सुरेश गांजरे यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले आहे. श्री. विनोद बुरबुरे यांनी या काव्यसंग्रहाला लाभलेली प्रस्तावना केवळ प्रस्तावना नसून कवयित्रीच्या लेखनशक्तीची पावती आहे. त्यांनीच मनीषा कांबळे यांना ‘आनंदकन्या’ हे संबोधन दिले. प्रसिद्ध साहित्यिक कवी आनंद गायकवाड यांनी त्यांच्या कवितेला सर्जनशील बळ दिले, तर प्रा. जोगेंद्र कवाडे यांसारख्या मान्यवरांनी शुभेच्छांद्वारे त्यांच्या साहित्यप्रवासाला प्रेरणा दिली. कवयित्री एका ठिकाणी लिहितात.

***“जो इतरांचे अश्रू पुसून हसणे शिकवतो तो बौद्ध,***
***जो सुंदर माणूसपण जगून दाखवितो तो बौद्ध!”***

या दोन ओळी त्यांच्या संपूर्ण साहित्यदृष्टिकोनाचे सार सांगून जातात. माणुसकी, करुणा आणि समतेचा संदेश देणारे हे शब्द त्यांच्या कवितेच्या आत्म्याशी एकरूप झालेले आहेत. एकूणच, ‘सूर्याचा सूर्य’ या काव्यसंग्रहातील २५ कविता या केवळ भावनांचे शब्दचित्र नाहीत, तर त्या सामाजिक न्यायासाठी झगडणाऱ्या एका विचारप्रवण समाजाची धगधगती मशाल आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना कवितेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कवयित्री मनीषा आनंदराव कांबळे (आनंदकन्या) यांनी केले आहे. त्यांच्या कवितेत संघर्ष आहे, विद्रोह आहे, करुणा आहे, पण त्याचबरोबर नव्या मानवतावादी समाजाची स्वप्नेही आहेत. म्हणूनच ‘सूर्याचा सूर्य’ हा काव्यसंग्रह मराठी आंबेडकरी साहित्यविश्वातील एक प्रेरणादायी आणि स्मरणीय दस्तऐवज ठरतो.●●

**राहुल खरात**

# सत्यपाल महाराज : अनेक कीर्तनकारांचे निर्मात



महाराष्ट्र ही प्रबोधन आणि प्रबोधनकारांची भूमी आहे.या भूमीत अनेक प्रबोधनकार जन्माला आले. त्यामुळेच महाराष्ट्राचा सामाजिक आणि वैचारिक पाया भक्कम आहे. याच श्रेणीमध्ये विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सत्यपाल नावाचा एक प्रबोधनकार जन्माला आला.अतिशय सर्वसामान्य कुटुंबात बहुजन समाजामध्ये जन्माला आलेला सत्यपाल हा मुलगा पुढे कीर्तनकार सत्यपाल महाराज, प्रबोधनकार सत्यपाल महाराज आणि आता प्रबोधनकारांचे प्रबोधनकार म्हणून नावलौकिकास आला आहे.सध्याच्या काळात सत्यपाल महाराज हे नाव माहीत नाही असे महाराष्ट्रात एकही गाव नसेल.एवढी लोकप्रियता आणि प्रसिद्धी सत्यपाल महाराजांना त्यांच्या प्रबोधनामुळे मिळालेली आहे.16 मे 1956 हा सत्यपाल महाराजांचा जन्मदिवस अर्थात प्रबोधन दिन ! अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात सिरसोली या गावात जन्माला आलेले सत्यपाल महाराज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन भजन,कीर्तनला सुरुवात करतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या खंजरी भजनाच्या माध्यमातून स्वातंत्र्य आंदोलनात आणि स्वातंत्र्यानंतर फार मोठे कार्य केले आहे.तोच खंजरी भजनाचा वारसा सत्यपाल महाराजांनी पुढे चालवत एका खंजरी पासून सात खंज-या वाजवत आपल्या किर्तनाला एक वेगळे स्वरूप प्राप्त करून दिले. म्हणूनच सप्तखंजरी वादक अशी पदवी सुद्धा लोकांनी त्यांना बहाल केली आहे.सत्यपाल महाराजांपासून प्रेरणा घेऊन अनेक सप्तखंजरी वादक कीर्तनकार तयार झाले आहे आणि ते सुद्धा अतिशय अभिमानाने आपल्या नावासमोर 'पाल' ही उपाधी लावून प्रबोधनाचे काम करतात.हे सर्व 'पाल' सत्यपाल महाराजांचा प्रबोधनरुपी वारसा पुढे नेण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे.कीर्तनाच्या क्षेत्राने सध्या व्यावसायिक स्वरूप धारण केलेले असताना आणि कीर्तनातून जातीयता,धर्मांधता,अंधश्रद्धा निर्माण करण्याचे प्रयत्न होत असताना सत्यपाल महाराज मात्र या गोष्टीपासून फार वेगळे आहे.सामाजिक भान आणि जाण ठेवून गाडगेबाबांचा समाजशील कीर्तनाचा वारसा त्यांनी जपलेला आहे.गाडगेबाबा ज्याप्रमाणे बहुजन समाजाच्या उद्धाराचा विचार रात्रंदिवस आपल्या कीर्तनातून मांडत होते;तीच परंपरा सत्यपाल महाराज पुढे चालवत आहे.भुकेलेल्यांना अन्न,तहानलेल्यांना पाणी,उघड्या नागड्यांना वस्त्र, गरीब मुला-मुलींचे शिक्षण,निराधारांना आधार ही गाडगे बाबांची पंचसूत्री सत्यपाल महाराज आपल्या कीर्तनात प्रत्यक्ष कृतीतून अंगीकारताना आपणास दिसून येते.निराधार,अनाथ,आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिला यांना महाराज दररोज आपल्या कीर्तनात साडीचोळी देऊन त्यांचा सन्मान करतात.त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मानसिकदृष्ट्या प्रोत्साहन आणि बळ देतात. कीर्तनातील लहान मुलामुलींना वैचारिक पुस्तकांचे वाटप करून त्यांच्यामध्ये शिक्षणाचे महत्त्व प्रतिबिंबित करतात.त्यामुळे लहान मुला मुलींना महाराजांचे कीर्तन खूप आवडते.त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी लहान मुले सर्वात आधी समोरच्या रांगेत येऊन बसतात. सत्यपाल महाराजांच्या कीर्तनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक कीर्तनातून अखंडपणे जातीय- धार्मिक सलोखा प्रस्थापित करणे.किर्तन सुरु असताना महाराज हिंदू,मुस्लिम,बौद्ध समाजाच्या लोकांना जवळ बोलावून एकमेकांच्या हातून सत्कार करून घेतात आणि सर्वांनी गुण्यागोविंदाने राहण्याचे आवाहन करतात.तरुणांना व्यसनमुक्तीचे आवाहन करून व्यसने सोडवितात.सध्याच्या काळात लोकांना ज्या गोष्टींची नितांत गरज आहे त्याच गोष्टी कीर्तनात सांगतात. बुवाबाजी,अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या निरर्थक गोष्टींना त्यांच्या कीर्तनात अजिबात थारा नसतो. महाराजांचे कीर्तन पूर्णतः विज्ञानवादी,परिवर्तनवादी, समतावादी विचारांचे असते. जातीयता,धर्मांधता यावर ते प्रचंड प्रहार करतात.छत्रपती शिवराय,फुले शाहू,आंबेडकर व आपल्या खऱ्या संतांचे पुरोगामी विचार हा त्यांच्या कीर्तनाचा पाया असतो.त्यामुळे इतर किर्तनकारांपेक्षा सत्यपाल महाराजांचे कीर्तन खूप निराळे असून लोकांच्या जीवनात प्रकाश आणि परिवर्तन निर्माण करणारे असते. सत्तर वर्षाच्या वयातही कीर्तन करताना त्यांच्यामध्ये असणारी चपळता, समयसूचकता,समोर बसलेल्या हजारो लोकांवर असलेले नियंत्रण,तीन तास जागेवरून कोणालाही हलू न देण्याची क्षमता व कला यामुळे सत्यपाल महाराजांची लोकप्रियता अजूनही कमी झालेली नाही.महिन्यातील एकही तारीख खाली नसणारे ते महाराष्ट्रातील एकमेव प्रबोधनकार आहे.परंतु आपली कीर्तनाची कला स्वतःपुरती मर्यादित न ठेवता अनेक कीर्तनकार तयार करून आज त्यांनी ते गेल्यानंतरही महाराष्ट्राच्या प्रबोधनाची व्यवस्था करून ठेवली आहे.हे त्यांचे महाराष्ट्रासाठी सर्वात मोठे योगदान आहे.संत तुकाराम, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा वैचारिक प्रबोधनाचा वारसा चालविणाऱ्या या महान आधुनिक संतास बहुजन समाजाचे प्रबोधन करण्यासाठी उदंड आयुष्य लाभो आणि त्यांना लवकरात लवकर महाराष्ट्र भूषण देण्याची सरकारला सद्बुद्धी येवो हीच त्यांच्या जन्मदिनी म्हणजेच प्रबोधन दिनी मनःपूर्वक सदिच्छा. ●●



**प्रेमकुमार बोके**
**9527912706**

# ओपन'मध्येही नको असलेले बहुजन?

मी 2014 साली जेव्हा नागपूर विद्यापीठात स्त्री अभ्यास विषयाच्या खुल्या जागेवर सहाय्यक प्राध्यापक पदासाठी अर्ज केला तेव्हा...

जातीचा कॉलम डॅश केला होता आणि धर्म बुद्धिस्ट लिहिला होता.

1) ओपनच्या उमेदवाराचा डी.डी. (रूपये500चा) भरलेला
2) मी मास्टर फर्स्ट क्लासमध्ये पास झालेली.
3) माझे वय तेव्हा 32 वर्षे होते.
4) स्त्री अभ्यास ज्ञानशाखेत / विभागात पीएचडी रजिस्ट्रेशन होऊन 2013 साली प्रबंध सबमिट केलेला होता.ओपनमधून निवड होण्यासाठी एवढं तगडं क्वालिफिकेशन असताना माझ्याऐवजी तिथल्या संचालक असलेल्या ब्राह्मणबाईंना (निलीमा देशमुख) रमेश द्विवेदी नावाचा त्यांचा ब्राह्मण विद्यार्थी या जागेवर घ्यायचा होता. या बाईंनी मुलाखती दरम्यान विषय तज्ञांना, कुलगुरू महोदयांना (डॉ. सपकाळ , सध्या एमजीएम विद्यापीठात कुलगुरू आहेत) जाम हैरान केले होते. अर्थात तज्ञ समिती माझ्या नावावर हटून बसल्याने बाईंचा नाईलाज झाला.परंतु मला निवडपत्र उशिरा मिळावे जेणेकरून मी वेळेतरुजू न झाल्यास द्विवेदीला दुसऱ्या क्रमांकाचा उमेदवार म्हणून नियुक्तीपत्र देण्याची खेळी बाईंनी करून ठेवलेली. नागपूर विद्यापीठातील परिचितांनी मला रुजू होण्यासाठी एक आठवडा बाकी उरलेला असताना माझ्या नियुक्तीची बातमी दिल्यानंतर मी धावत जाऊन रूजू होण्यासाठी एक महिन्याची मुदतवाड घेऊन आलेले. अर्ज छाननीवेळी आणि नियुक्तीझाल्यानंतर बाईंनी जात शोधण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. पण मी गावाचा पत्ता न दिल्यामुळे गाव कनेक्शन वापरून जात शोधणे बाईंना जमले नाही. बाईंनी माझी जात पुणे विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. अनघा तांबे यांना फोनवरून विचारून घेतली होती. आपण ठरवलेला ब्राह्मण उमेदवारच इथे नियुक्त होणार यावर संचालक



बाईंना फुल कॉन्फिडन्स असल्यामुळे विषय तज्ञांनी घेतलेल्या निर्णयानंतर बाई जाम भडकलेल्या. 'ओपनच्या जागेवर एससी कॅंडिडेट घेतला जाऊ शकत नाही' हे मला त्या रुजू होण्याच्या दिवशी बजावून सांगत होत्या! आणि मी बाईंना वारंवार सांगत होते , 'मी बौद्ध आहे. ओपनचा डीडी भरलेला आहे. फर्स्ट क्लास पास आहे. मी महाराष्ट्रातली पहिली स्त्री अभ्यास विभागात रजिस्ट्रेशन असलेली, पीएचडी सबमिट केलेली विद्यार्थिनी आहे. ब्राह्मणी उर्मटपणा दाखवत बोलल्या, 'तू काय तिबेट वरून आली आहेस? की रूपा कुलकर्णीसारखी बौद्ध झालीस? ओपनचे विद्यार्थीकोर्टात गेलेले आहेत तेव्हा तू रुजू होऊ शकत नाही. बौद्ध म्हणजे कोण? हे आम्हा नागपूरकरांना चांगलं माहिती आहे ' अनघा तांबे यांच्याशी बाईंचा जो फोन झाला होता तो तांबेंनी जसाच्या तसा मला सांगितल्यामुळे मी संघर्षाच्या तयारीतच गेलेली. 'आरक्षित वर्गातले लोक ओपनमध्ये नियुक्त होऊ लागले तर आपल्या मुलांनी कुठे जायचं? ब्राह्मण म्हणून मी तुला सांगत आहे. मला इथे द्विवेदीला घ्यायचे आहे. तू तिला इथे येण्यापासून थांबव. सांग की, 'नागपूर एकट्या मुलींसाठी चांगलं नाही!' .... अनघाला मी जेवढी खमकी म्हणून माहिती होती ते सांगून म्हणाली, ‘धम्मसंगिनी नागपूर काय कुठेही राहू शकते.... ओपन पोस्टबाबत तर मी असं तिला सांगूच शकत नाही, कारण आम्ही पुणे विद्यापीठात जर आरक्षित वर्गातले उमेदवार मेरिटचे असतील तर ओपनच्या पोस्टवर घेतच असतो....' अनघा प्रोग्रेसिव्ह ब्राह्मण असल्याने सनातनी ब्राह्मण असलेल्या देशमुख बाईंशी तसा असहकार केला .देशमुख बाईंचा नाईलाज झाला. अनुच्छेने कडवट तोंड करून त्यांनी मला रुजू करून घेतले आणि नऊ महिन्यात सात मेमो दिले. मी माझ्या पद्धतीने सन्माननीय संघर्ष केला. बाईंना संचालक पद सोडावं लागलं. ही बरीच दीर्घ कहाणी आहे आणि संघर्ष अजून सुरूच आहे.... तो पुन्हा कधीतरी. पण मी आज यासाठी शेअर करत आहे आज महाराष्ट्र सरकारने आरक्षणाची कोणतीही सवलत (शुल्क , गुण, वय, अटेम्प्ट ) घेतल्यास ओपन जागेवरती आरक्षित प्रवर्गातल्या उमेदवाराची नियुक्ती होणार नाही याबाबतचा आदेश काढलेला आहे हा आदेश/ कारस्थान ब्राह्मणी समजूतदारीत (brahmanical mutual understanding) अगोदरच या नियमांपेक्षा क्रूर तर्हेने सर्वत्र राबविले जात होते. म्हणजे (शुल्क , गुण, वय,) आरक्षित प्रवर्गाला असलेली एकही सवलत न घेतलेले कितीतरी उमेदवार विद्यापीठासारख्या शैक्षणिक संस्थामध्ये केवळ ब्राह्मण नाहीत म्हणून डावडलेले आहेत. तर ग्रामीण भागातील महाविद्यालयांमध्ये मराठा नाहीत म्हणून डावडलेले आहेत..... एकूणच निवड प्रक्रिया कुठेच पारदर्शक नाही. प्रशासन, शैक्षणिक संस्था, इतर सार्वजनिक क्षेत्रात नोकरभरती पारदर्शक होण्यासाठी कठोर यंत्रणा उभी केली नाही तर मेरिटच्या नावाखाली ही बामनी नोकरशाही नरड्यावर बसल्याशिवाय राहणार नाही. प्रश्न फक्त एससी / एसटीचा नाही ओबीसी आणि एसबीसीचा पण आहे! भाजपाच्या मांडीला मांडी लावून विकासासाठी सत्तेत बसलेले बहुजन काय करत आहेत? पारदर्शक निवड प्रक्रिया करा. तुम्हाला ओपनमध्ये पण मागे टाकण्याची क्षमता बाळगून आहोत.... मागे पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाच्या जागा निघाल्या होत्या या जागांमध्ये कोणता विषय कोणत्या प्रवर्गाला आहे हे दाखवलेच नव्हते तर आरक्षित वर्गातले संबंधित विषयातले उमेदवार अर्ज करतील तरी कसे? याचा तोटा केवळ खालच्या जातीतल्या आरक्षितांचाच नाही तर मधल्या जातीतल्या आरक्षितांचा पण आहे! ●●

**-धम्मसंगिनी**

# आपला पत्ता का देत नाहीत ही माणसे?

आधीची जुनी रेल्वे होती, तेव्हा किती छान दिवस होते. बाजूला बसलेल्या प्रवाशाशी क्षणात ओळख व्हायची. गप्पांना बहर यायचा. पिशव्यांमधून चिवडा निघायचा, किंवा पिठलं-भाकरी निघायची. मिळून आस्वाद घेताना किती मजा यायची. मुलं गाण्यांच्या भेंड्या खेळायचे. त्यात मोठेही सहभागी व्हायचे. एका गावावरून दुसऱ्या गावाला जायला खूप वेळ लागायचा. डब्यातच काका- मामा अशी नाती निर्माण व्हायची. ओळखीचं एक गाव तयार व्हायचं. काय मज्जा यायची! संथ असला तरी कंटाळवाणा नव्हता तो प्रवास. फार दिवस नाही झाले. अगदी आताआतापर्यंत हे चित्र असायचं. अचानक कसा काळ बदलला? जग असं अचानक एवढं गतिमान कसं झालं? रेल्वे सुसाट पळायला लागल्या. स्टेशनं लवकर यायला लागली. लोकं लवकर उतरायला लागली. आता तर या प्रवासात कुणाशी ओळखच करून घ्यावीशी वाटत नाही. ओळख झाली न झाली तोच त्याचं स्टेशन येतं. सोबतचा प्रवासी आपल्याच घाईत उतरून जातो. उतरण्याच्या लगबगीत आपल्याकडं बघायला, निघतो म्हणायला, साधं हलकेच हसून बघायला त्याला वेळ नसतो. लोकांना एवढी घाई का असते उतरण्याची? आणि यांची स्टेशनं एवढ्या भराभर का येतात? एक तर ही माणसं सांगतसुध्दा नाहीत, बोलता बोलता मध्येच उतरून जातात. आपण त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडं बघत राहायचं, आणि यांनी खुशाल निघून जायचं? एक उतरतो, मग दुसरा, तिसरा, चौथा.... एकाच्या विचारातून सावरत नाही तोच दुसरा उतरतो. खूप लांबचा प्रवास



करायचा आहे, अशा अविर्भावात निवांत बसलेली माणसे, क्षणात कशी मध्येच उतरून निघून जातात? बरं त्यांचं तरी ठीक. काही तर अशी असतात ना खोटारडी; सांगतात एक करतात एक. खूप बातेबंबाल म्हणजे बोलघेवडी असतात. खूप दूरपर्यंत सोबत आहे म्हणून सांगतात; अन आपल्याला गाफील ठेवून मध्येच डाव साधतात. निघून जातात. काही तर साखळी ओढून मध्येच उतरतात. कुणाच्या ध्यानीमनी नसताना. अकस्मात. चारसौ बीस कुठले!आपण बसा त्यांच्या आठवणींशी खेळत. रिकामी झालेली आसनं न्याहाळत. अशी कशी वागू शकतात ही माणसं? हा कुठला न्याय? काही फिकीर आहे की नाही कुणाची? काय समजतात काय हे स्वतःला? बरं ही लोकं जातात तरी कुठे? शाहिद कबीर यांनाही प्रश्न पडला होता- कुणास ठाऊक कुठं जातात,_ _साधी हाकही देत नाहीत ही माणसे...जातात तर जातात_ _आपला पत्ताही का देत नाहीत निघून दूर जाणारी ही माणसे..? ●●

**संजय मेश्राम.**

# संघर्षातून अंतिम ध्येय गाठणारी नायिका प्रधान कादंबरी - “विवंचना”

विवंचना ही डॉ. कोंडबा भगवान हाटकर लिखित आणि कैलाश पब्लिकेशन्स यांनी प्रकाशित केलेली नायिका प्रधान कादंबरी आहे. सामाजिक वास्तव, जातव्यवस्था, स्त्रीजीवनातील संघर्ष आणि बुद्ध-फुले-आंबेडकरी विचारसरणी यांचा प्रभावी संगम या कादंबरीत दिसून येतो. कादंबरीतील मुख्य पात्रे अशोक आणि रेशमा ही सावरगावातील एकाच शाळेत शिकणारी हुशार विद्यार्थी आहेत. अशोक हा बुद्ध-फुले-आंबेडकरी विचारांनी प्रेरित असलेला तरुण असून रेशमा ही बहुजन समाजातील प्रतिष्ठित पाटील घराण्यातील मुलगी आहे. लहानपणापासून दोघांमध्ये जिव्हाळा निर्माण होतो आणि त्यांच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात होते. मात्र जातव्यवस्था आणि समाजमान्य परंपरा त्यांच्या प्रेमाच्या आड येतात. रेशमाच्या आयुष्यातील संघर्षाला तिच्या अनिच्छेने झालेल्या लग्नापासून सुरुवात होते. घराण्याची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी तिचे लग्न धनाढ्य पण क्रूर वृत्तीच्या दौलतशी लावले जाते. लग्नाच्या पहिल्याच रात्री तिला अमानुष वागणूक सहन करावी लागते. त्या मानसिक धक्क्यामुळे ती घर सोडून निघून जाते. यानंतर तिच्या आयुष्यातील खरी “विवंचना” सुरू होते. लेखकाने ग्रामीण समाजातील जातीय मानसिकता आणि स्त्रीशोषणाचे वास्तव प्रभावीपणे मांडले आहे. रेशमाचे काका बाजीराव आणि किर्तनकार संपतराव महाराज यांच्या माध्यमातून समाजातील ढोंगी, मनुवादी आणि वासनांध प्रवृत्तीचे दर्शन घडते. बाहेरून धर्म, संस्कार आणि प्रतिष्ठेच्या गोष्टी करणारी माणसे प्रत्यक्षात स्त्रियांचे शोषण कसे करतात, हे लेखकाने अत्यंत वास्तववादी पद्धतीने दाखवले आहे. रेशमाची आई राधाबाई हिचे पात्रही विशेष लक्षवेधी आहे. ऐन तारुण्यात विधवा झालेल्या राधाबाईच्या मानसिक आणि शारीरिक संघर्षाचे चित्रण लेखकाने संवेदनशीलतेने केले आहे. परिस्थितीमुळे तिचा जीवनमार्ग भरकटतो आणि त्याचा परिणाम रेशमाच्या आयुष्यावरही होतो. अशोक रेशमाच्या विरहामुळे मुंबईला निघून जातो. दुसरीकडे रेशमा त्याच्या शोधात महाराष्ट्रापासून उत्तरप्रदेशातील सारनाथ, काशी, पंढरपूर अशा ठिकाणी भटकते. उपासमार, अपमान, भीती आणि असंख्य संकटांचा सामना करत ती आशा सोडत नाही. अशोक भिक्खू झाला असेल या विचाराने ती प्रत्येक विहारात जाऊन त्याचा शोध घेते. तिची जिद्द, संयम आणि प्रेमातील प्रामाणिकता वाचकाला भावते. अखेर अनेक




वर्षांच्या संघर्षानंतर मुंबईत रेल्वे स्टेशनवर अशोक आणि रेशमाची भेट होते. हा प्रसंग लेखकाने अतिशय भावनिक आणि सुंदर शब्दांत रंगवला आहे. पुढे अशोकला बँकेत नोकरी मिळते आणि दोघे नोंदणी पद्धतीने विवाह करून नवीन आयुष्याची सुरुवात करतात. कादंबरीचा शेवट सकारात्मक असून बुद्ध-आंबेडकरी विचारांच्या सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा आहे. प्रस्तुत कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे तिची उत्कंठावर्धक मांडणी आणि सामाजिक वास्तवाचे प्रभावी चित्रण. लेखकाने जात, स्त्रीशोषण, धार्मिक ढोंग आणि सामाजिक विषमता यांवर कठोर भाष्य केले आहे. त्याचबरोबर बुद्ध, फुले, शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैज्ञानिक व मानवतावादी विचारांचा पुरस्कार केला आहे. प्रा. माधव सरकुंडे यांनी लिहिलेली प्रस्तावना कादंबरीच्या आशयाला अधिक गहिरेपण देते. लेखकाची निरीक्षणशक्ती, सामाजिक जाणीव आणि प्रभावी लेखनशैली यामुळे “विवंचना” ही कादंबरी वाचकांच्या मनावर ठसा उमटवते. संघर्षातून स्वतःचे अस्तित्व आणि अंतिम ध्येय गाठणाऱ्या स्त्रीची ही प्रेरणादायी कथा आहे. कादंबरी लेखकाच्या पुढील साहित्य प्रवासाला अनंत सदिच्छा. ●●

**माया वासनिक गेडाम**

कादंबरी : विवंचना
लेखक : डॉ. कोंडबा भगवान हाटकर
प्रकाशक : कैलाश पब्लिकेशन्स
छत्रपती संभाजी नगर
औरंगाबाद प्रथमावृत्ती : १८ ऑक्टोबर २०२५
पृष्ठसंख्या : १६० : किंमत : ३००₹/

# बौद्धांची प्रगती केवळ बौद्ध धम्मामुळेच

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मी माझे शेवटचे दिवस बौध्द धम्माच्या प्रचारात घालवणार आहे, असे उद्गार धर्मांतरापूर्वी म्हणजे १३ मे १९५३ रोजी बुध्द जयंतीनिमित्त नरेपार्क मुंबई येथे आयोजित केलेल्या जाहीर व्याख्यानात काढले होते.यावेळी उपस्थित महार समुदायाला धर्मांतराचे महत्व पटवून सांगताना ते म्हणाले, जातीभेदाचे मूळ कायमचे उपटून टाकण्यासाठी आपण हिंदू धर्माचा त्याग करणे आवश्यक आहे.चैनीत असलेल्यांना पायाखाली काय कुजत आहे,याची जाणीव येणार नाही.ही जातीभेदाची समाजरचनाच जर उलथून पाडावयाची असेल तर आपणास बौध्द धर्माचीच शिकवण अंमलात आणली पाहिजे.पुढे गंभीर व भावूक होत ते म्हणाले,ही गोष्ट मी निव्वळ गळ्यापासून बोलत नसून बेंबीच्या देठापासून बोलत आहे.याच व्याख्यानात त्यांनी आपली मी माझा प्रचार तुमच्यापूरताच मर्यादित न ठेवता साऱ्या हिंदू धर्माला या नव्या क्षेत्रात आणण्याचा प्रयत्न करीन, अशी दृढ इच्छाशक्ती प्रकट केली. यावरून बाबासाहेबांनी भारतात धम्मराज्य स्थापित करण्याच्या उद्देशानेच मी संपूर्ण भारत बौद्धमय करीन,असा संकल्प जाहीर केल्याचे त्यांच्या त्यावेळच्या वाटचालीवरून दिसून येते.या पार्श्वभूमीवर सद्य स्थितीत स्वतःला समाजाचे तारणहार समजणारे काही सेवानिवृत्त अधिकारी जनगणना २०२६-०२७ मध्ये धर्म बौद्ध व जात महार अशी नोंद करण्याचे आवाहन करून समाजाला बाबासाहेबांनी दाखविलेल्या मार्गाने नेण्याऐवजी त्यांना अगदी उलट



दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार जनगणना २०२६-२७ मध्ये जातीची नोंद न केल्यास अनुसूचित जातींची संख्या कमी होऊन आम्ही अल्पसंख्याक होऊ.त्यामुळे आम्हाला अनुसूचित जातीच्या नावावर मिळणारे निवडणुकीतील राखीव जागा व शैक्षणिक तसेच नोकरी विषयक आरक्षण व इतर लाभ बंद होतील.समाजाचे यात मोठे नुकसान होईल.या चिंताग्रस्त लोकांना असलेल्या समाजाच्या काळजीपोटी एक साधा प्रश्न विचारला गेला पाहिजे.बौध्द धम्म स्वीकारल्यानंतर मिळकतीचे कोणतेही साधन नसलेल्या बहुसंख्य धर्मांतरीत बौध्दांसमोर उपजिविका कशी चालवायची हाच मोठा जटील प्रश्न होता.परंतु बाबासाहेबांचा आदेश शिरसावंद्य मानून त्यांनी भाकरीपेक्षा स्वाभीमानाला अधिक महत्त्व दिले.महारांच्या उपजिविकेचा असाच एक प्रश्न केसरीच्या एका बातमीदाराने बाबासाहेबांना विचारला होता.त्याचे मोठे खोचक उत्तर त्यांनी त्या बातमीदाराला दिले होते. आमच्या लोकांच्या बदल्यात मेलेली ढोरे ओढण्याचे काम तुम्ही व तुमच्या नातेवाईकांनी करून आमच्या लोकांना मिळणारे ५०० रूपयांचे उत्पन घ्यावे.हा फायदा तुम्ही अवश्य घ्यावा.शिवाय दरवर्षी मी स्वतः तुम्हाला ५०० रूपये वर देण्याची व्यवस्था करतो.माझ्या लोकांचे काय होईल.त्यांना अन्न वस्त्र मिळेल की नाही ते माझे मी पाहीन.मग एवढी फायद्याची गोष्ट तुम्ही कां सोडून देता.तुम्ही का हे करीत नाही.आम्ही हे काम केले म्हणजे फायदा होतो.आणि तुम्ही केले म्हणजे फायदा नाही.ओढा ना तुम्ही मेलेली ढोरे,असे ते उत्तर होते.या पार्श्वभूमीवर आजच्या पिढीला जनगणनेत महार जातीची नोंद करण्याचे सुचवून त्यांच्या फायद्या तोट्याचे गणीत समजावून सांगणाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर आपल्या पूर्वजांचा धंदा नव्याने सुरू केल्यास आजच्या गणीतानुसार फडणवीस-शिंदे सरकार थोडी थोडकी नव्हे तब्बल १५ कोटी रूपयांची बक्षिसी देईल.केसरीच्या बातमीदाराला बाबासाहेबांनी दिलेला सल्ला आजच्या सल्लागारांनी स्वतः उपयोगात आणून महारकीच्या कामाचा मोबदला म्हणून मिळणाऱ्या कोट्यानुकोटी रूपयांचा घसघशीत फायदा खरंच सोडू नये. आरक्षणामुळे झालेल्या भौतिक प्रगतीपेक्षा बौध्द धम्मामुळे बौध्दांची जास्त मानसिक व वैचारिक प्रगती झाली आहे.बाबासाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे बौध्द धम्म जातविरहित एकजिनसी समाजरचनेचा पूरस्कार करतो.अशा या धम्मात जनगणना २०२६-०२७ च्या माध्यमातून धर्म बौध्द व जात महार नोंदविली गेल्यास बौद्ध धम्मात जाती निर्माण करण्याला बौध्दच कारणीभूत ठरतील.हा दोष चिकटवून घेण्याचे पातक आरक्षणाच्या चिंतेने ग्रासलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून बौद्धांनी करू नये. २०२६-०२७ च्या जनगणनेमध्ये धर्म बौद्ध व जात निरंक अशी नोंद करून धम्म स्वीकारण्याची इच्छा असणाऱ्या इतर जातींच्या लोकांसमोर आदर्श निर्माण करावा. ●●



**जोगेंद्र सरदारे**
**मो.9422138322**

## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा संविधान चौक, देवळी वर्धा



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा संविधान चौक, देवळी तालुका राज्य महामार्गवर आहे. या परिसरातील लोक मोठ्या प्रमाणावर येथे एकत्र येऊन दिनविशेष कार्यक्रम येथे नित्यनेमाने साजरे करतात. वर्धा जिल्ह्यातील महत्वाचा तालुका म्हणून देवळी तालुक्याची ओळख आहे. अनुसूचित जाती करिता हा राखीव विधानसभा मतदारसंघ आहे.

संवाद मित्र
राजू थुल
9423420031

# मानवतेला वाचवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे तथागत गौतम बुद्धांचे प्रज्ञेचे विचार

## विश्वशांती परिषदेत श्रीलंकेचे माजी मंत्री डॉ. विजयदासा राजपक्षे यांचे प्रतिपादन

**नागपूर :** "जगभर पसरलेली अशांतता, युद्धजन्य परिस्थिती आणि वाढती हिंसा यामध्ये मानवतेला वाचवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे तथागत गौतम बुद्ध यांनी दिलेले करुणा, मैत्री आणि प्रज्ञेचे विचार," असे प्रतिपादन श्रीलंकेचे माजी मंत्री डॉ. विजयदासा राजपक्षे यांनी केले.

रेशीमबाग येथील सुरेश भट्ट सभागृहात आयोजित 'विश्व शांती परिषद २०२६' दरम्यान ते बोलत होते. इंडो एशियन मेत्ता फाउंडेशन, संघ काया फाउंडेशन, दीक्षाभूमी चॅरिटेबल ट्रस्ट आणि ग्लोबल युनायटेड एज्युकेशन अँड सोशल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा शुभारंभ सामूहिक बुद्ध वंदनेने करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भंते प्राशीलरत्न यांनी केले, तर स्वागतपर भाषण नितीन गजभिये यांनी केले. आभार प्रदर्शन रत्नदीप रंगारी यांनी मानले. आपल्या संबोधनात डॉ. राजपक्षे म्हणाले की, "आज संपूर्ण जग युद्धाच्या विभीषिकेमुळे त्रस्त आहे. अशा वेळी बुद्धांनी दिलेला शांततेचा मार्गच समाज आणि राष्ट्रांमध्ये बंधुभाव निर्माण करू शकतो."



या परिषदेत भारत, श्रीलंका, दक्षिण कोरिया, लाओस, थायलंड आणि नेपाळ येथील बौद्ध भिक्खू व विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. श्रीलंकेतील महानायक वेन. मदम्पगामा अस्सजी थिसा, अंबलगोडा धम्मलंकारा थेरो, खासदार अथुरलिये रथना थेरा यांच्यासह दक्षिण कोरियाच्या डॉ. ली ची रान, लाओसचे थेपसाकदा फेतसालाथ, नेपाळचे भिक्खू तपसी धम्म आणि थायलंडच्या सिस्टर अन्नमिचाई यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान, डॉ. एम. के. ओतानी, रेल्वे बोर्डाचे सदस्य डॉ. सेठी, मुंबईचे सय्यद शब्बीर हाजी तसेच भंते राजरत्न यांची प्रमुख उपस्थिती होती.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी देशपांडे सभागृहात भिक्खू संघदान आणि आंतरराष्ट्रीय वक्त्यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले असून, आंतरराष्ट्रीय कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रमही सादर होणार आहेत. तसेच इंदोरा मैदान येथे थायलंडच्या बौद्ध गायिका सिस्टर अन्नमिचाई, गायिका धनश्री बुरबुरे आणि राजेश बुरबुरे यांच्या बुद्ध गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

याशिवाय १७ मे रोजी इंदोरा मैदान येथे गायक डॉ. अभिजित कोसंबी आणि त्यांच्या संचाचा 'भीम बुद्ध जलसा' हा विशेष कार्यक्रम रंगणार आहे.

या परिषदेदरम्यान विविध देशांतून आलेल्या भिक्खू संघाने आणि प्रतिनिधींनी तथागत बुद्धांचा शांततेचा संदेश तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवतावादी विचारांचा प्रसार जनमानसात करण्याचा सामूहिक संकल्प केला.

या भव्य आयोजनाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समितीचे रमेश वानखेडे, स्मिता वाकडे, रत्नदीप रंगारी, क्षितिज गायकवाड, नरेश महाजन आणि मुकेश बागडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महत्वाचे



### सडक अर्जुनी येथे भिक्खू संघाचे आगमन व स्वागत

**सडक अर्जुनी :** तालुका बौद्ध संघाच्या वतीने शांतीकरिता पदयात्रा अंतर्गत सडक अर्जुनी तालुक्यातील बौद्ध विहारांना भेटी उपक्रम 9 ते 18 मे च्या दरम्यान सुरू असून भिक्खू संघ व श्रामणेर संघ भेटी देत आहेत. सडक अर्जुनी येथे भिक्खू संघ व श्रामणेर संघाचे आगमन होताच बौद्ध उपासक व उपासिका यांनी त्यांचे स्वागत केले. सर्व प्रथम भन्तेजी यांचे हस्ते मुख्य रस्त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संबोधी बौद्ध विहार येथे बुद्धवंदना घेण्यात आली. नंतर भन्ते सिवली यांनी धम्मदेशना दिली. यावेळी भिक्खू संघ व श्रामणेर संघ यांना भोजनदान करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बौद्ध उपासक-उपासिका यांनी सहकार्य केले.

### लहान बालकांवर सुसंस्कार करणे ही काळाची गरज : ज्ञानेश्वर रक्षक

**नागपूर :** आजच्या आधुनिक युगात लहान मुलांवर संत-महापुरुषांच्या विचारांचे संस्कार करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन ज्ञानेश्वर रक्षक यांनी केले. अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ हे आचार्य हरिभाऊ वेरुळकर आणि रवि मानव यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील शेकडो ठिकाणी बालसंस्कार शिबिरांचे आयोजन करत असून, ही नवीन पिढीसाठी एक सुवर्णसंधी असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी श्री गुरुदेव युवा मंचचे प्रवर्तक म्हणून कार्य करणाऱ्या ज्ञानेश्वर रक्षक यांचा सत्कार गोपाल सिंगुरकर आणि सचिव गंगाधरराव घोडमारे यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच पिसे यांचा सत्कार डॉ. सोनिया खोरगडे यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाला शिबिराचे प्रशिक्षक सप्तखंजरीवादक मोहनदास चोरे, बावनकुळे, डॉ. चर्जन, मानकर, अरुणराव खाजोणे, चालखोर, प्रणाली तिजारे, शिबिर संयोजक आदर्श कोळमकर, प्रशिक्षक आकाशपाल निस्ताने महाराज तसेच कीर्तनकार बेव्हणे महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.




### चारिका बुद्ध विहारात २५७० वी बुद्धजयंती उत्साहात साजरी

**नागपूर :** बुद्ध पूर्णिमा निमित्त नागपूरातील चारिका बुद्ध विहार येथे २५७० वी बुद्धजयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाले.

यानंतर चारिका बुद्ध विहार समितीच्या पुष्पा मेंढे तसेच अन्य महिलांनी गौतम बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महिला मंडळाच्या वतीने सामूहिक बुद्ध वंदना घेतली. कार्यक्रमात भंते करुणानंद यांनी धम्मदेशना देत बुद्धांच्या करुणा, मैत्री आणि मानवतेच्या संदेशाचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले. यावेळी मिलिंद गणवीर परिवार आणि सहारे परिवार यांच्यावतीने चिवरदान व धम्मदान करण्यात आले. तसेच अनेक उपासकांनीही धम्मदान करून सहभाग नोंदविला. खिरदानानंतर पहिल्या दिवसाचा कार्यक्रम संपन्न झाला. दुसऱ्या दिवशी लहान मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध बौद्धिक स्पर्धा आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश गजभिये, वसंत वाघमारे, सुधीर वाळके तसेच महिला मंडळाने विशेष परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### श्रीराम खोबरागडे



**नागपूर :** बंजारीनगर येथील सुधा विहार अपार्टमेंटमध्ये वास्तव्यास असलेले श्रीराम खोबरागडे यांचे दि. १६ मे २०२६ रोजी आकस्मिक आजाराने निधन झाले. ते दुपारी १.४५ वाजता सदर येथील शांती मोहन रुग्णालयात उपचारादरम्यान निधन पावले. त्यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा कामगारनगर चौक परिसरातील सुरेश मेश्राम यांच्या निवासस्थानावरून नारी घाटावर अंत्यसंस्कार पार पडले.

## नरखेड नगरपरिषदेत नव्याने निवडून आलेल्या ओबीसी प्रतिनिधींचा सत्कार

**नरखेड :** छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त नरखेड नगरपरिषद येथे नव्याने निवडून आलेल्या ओबीसी नगरसेवकांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमासाठी नागपूर येथून वंदना वनकर, विजय हटवार, सुनील नासरे, रेवतकर आदी उपस्थित होते.

नगरपरिषद मुख्य कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून घोषणाबाजी केली . यावेळी नगराध्यक्ष मनोजदादा कोरडे यांच्यासह संजयदादा कामडी, राजेंद्रदादा बालपांडे, प्रकाशदादा बालपांडे, कविता शेंदरे, राजेश क्षीरसागर, छाया खुरसुंगे, हर्षलता रेवतकर, रोहिणी कळंबे आणि पद्मा टेकाडे या नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांचा सत्कार केला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित प्रतिनिधींनी नगर विकास, सामाजिक प्रश्न आणि ओबीसी समाजाच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. चर्चेत मांडण्यात आलेल्या मुद्द्यांवर अंमलबजावणी करण्याचे आश्वासन पदाधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी सत्यशोधक महिला महासंघच्या अध्यक्षा वंदना वनकर यांनी नरखेडच्या सामाजिक आणि ऐतिहासिक वारशाच्या आठवणींना उजाळा देत तालुक्याच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी लोकशाहीर उकंदराव खोडे यांच्या कार्याचाही उल्लेख केला.



## डॉ. राजरत्न सावंत एम.डी. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**चिपळूण :** कळमुंडी गावचे सुपुत्र व उमरोली येथील रहिवासी डॉ. राजरत्न राष्ट्रपाल सावंत यांनी अण्णासाहेब डांगे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, आष्टा (सांगली) येथून एम.डी. पंचकर्म ही पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



डॉ. राजरत्न हे कवी-साहित्यिक तथा डॉ. आंबेडकर वाचनालयचे अध्यक्ष राष्ट्रपाल भागुराम सावंत आणि आकांक्षा सावंत यांचे सुपुत्र आहेत. त्यांनी २०२१ मध्ये कोडोली, कोल्हापूर येथून बी.ए.एम.एस. पदवी प्राप्त केली होती. तसेच ई.एम.एस. आणि सीसीएच अभ्यासक्रम पूर्ण केले असून सध्या फेलोशिप इन इंटरनल मेडिसिनचे शिक्षण सुरू आहे.

त्यांच्या यशाबद्दल लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, चिपळूण तालुका बौद्धजन हितसंरक्षक समिती तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक संस्थांनी अभिनंदन केले आहे. वाचन, गायन, अभिनय आणि दिग्दर्शनाची आवड असलेल्या राजरत्न सावंत यांनी भविष्यात सामाजिक क्षेत्रात कार्य करत रुग्णसेवा करण्याचा मानस व्यक्त केला आहे.

## दीक्षाभूमी येथे आज "आठवी बहुजन परिषद"; "आंबेडकर मेला ऑन व्हील्स" अभियानाचा आज समारोप

नागपूर : दीक्षाभूमी येथे रविवार, 17 मे 2026 रोजी "आठवी बहुजन परिषद" आयोजित करण्यात आली असून, राज्यभर राबविण्यात आलेल्या "आंबेडकर मेला ऑन व्हील्स" या जनजागृती अभियानाचा समारोप या परिषदेद्वारे होत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रातील सर्व 36 जिल्ह्यांमध्ये आंबेडकरवादी चळवळीप्रती जनजागृती निर्माण करण्यासाठी मान्यवर कांशीराम यांच्या जयंती दिनापासून, म्हणजे 15 मार्च 2026 पासून "आंबेडकर मेला ऑन व्हील्स" हे राज्यव्यापी अभियान सात टप्प्यांत राबविण्यात आले.



या अभियानादरम्यान नागपूर, अमरावती, जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, अहमदनगर, पुणे, रायगड, मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, औरंगाबाद, जालना, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, अकोला, वाशिम, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ, नांदेड, लातूर, धाराशिव, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, बीड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांसह 131 तहसीलमध्ये पोहोचून व्यापक जनजागृती करण्यात आली.

संपूर्ण अभियानात 47 दिवसांत तब्बल 9229 किलोमीटरचा प्रवास करण्यात आला. यावेळी 430 नुक्कड सभा आणि 34 जाहीर सभा अशा एकूण 464 सभा घेण्यात आल्या. तसेच 30 हजार माहितीपत्रकांचे वितरण, 3 हजार पोस्टर्सचे चिकटविणे आणि 3 हजार कॅलेंडर्सचे वितरण संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आले.

आज होणाऱ्या बहुजन परिषदेत महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यांतील प्रतिनिधी सहभागी होऊन विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय विषयांवर आपली मते मांडणार आहेत.

"कहीं हम भूल न जायें" अभियानाचे अ‍ॅड. अतुल पाटील यांनी महाराष्ट्रातील तमाम नागरिकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# आरक्षणवाद्यांचा घात आणि बहुजनांची फसवणूक डॉ. नितीन राऊत

**नागपूर :** स्पर्धा परीक्षांमध्ये राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा करण्यापासून रोखण्याच्या राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयावर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा निर्णय म्हणजे बहुजन समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रकार असल्याची घणाघाती टीका त्यांनी केली.

मंत्रिमंडळाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना डॉ. राऊत म्हणाले की, संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या तरतुदीनुसार राखीव प्रवर्गातील एखादा उमेदवार स्वतःच्या गुणवत्तेवर खुल्या प्रवर्गातील गुण प्राप्त करत असेल, तर त्याला खुल्या प्रवर्गातून निवडले जाणे हा त्याचा घटनादत्त अधिकार आहे. मात्र,



वयोमर्यादा किंवा शुल्कातील सवलतीचे कारण पुढे करून अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून वगळणे म्हणजे त्यांच्या गुणवत्तेचा अपमान आहे.

ते पुढे म्हणाले की, राखीव प्रवर्गातील विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करून शिक्षण घेतात. अशा विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या शर्यतीतून बाहेर ठेवणे म्हणजे त्यांच्या प्रतिभेवर अन्याय करण्यासारखे आहे. सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी दिलेल्या निकालांमध्ये गुणवत्ताधारक उमेदवार कोणत्याही प्रवर्गातील असला तरी तो खुल्या जागेसाठी पात्र असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे सरकारचा निर्णय न्यायालयीन भूमिकेलाही छेद देणारा असल्याचा आरोप त्यांनी केला.

डॉ. राऊत यांनी राज्य सरकारवर आरक्षण संपवण्याचा छुपा प्रयत्न केल्याचाही आरोप केला. "राज्यात बेरोजगारी वाढलेली असताना उपलब्ध संधींवर जाचक अटी लादून मागासवर्गीयांच्या हक्कांवर गदा आणली जात आहे. सरकार केवळ घोषणाबाजी करत असून प्रत्यक्षात आरक्षणाच्या मूळ हेतूलाच बाधा पोहोचवत आहे," असे ते म्हणाले.

महायुती सरकार विशिष्ट विचारसरणीला खुश करण्यासाठी बहुजन समाजाचे नुकसान करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. आरक्षणाची टक्केवारी ७२ टक्क्यांवर गेल्याचा मुद्दा पुढे करून सरकार खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करत असले, तरी त्यामागे मागासवर्गीयांच्या हक्कांची कपात करण्याचे धोरण असल्याचे त्यांनी म्हटले.

"या निर्णयाचा सरळ अर्थ असा होतो की, मागासवर्गीयांनी खुल्या प्रवर्गाशी गुणवत्तेच्या आधारावर स्पर्धाच करू नये, अशी सरकारची भूमिका आहे. बुद्धिमत्ता आणि गुणवत्ता कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी नसते. राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता दडपण्याचे हे षडयंत्र आहे," असा आरोप करत डॉ. राऊत यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.




## आंध्र प्रदेशातील घटनेच्या निषेधार्थ नागपुरातील वकिलांचे आंदोलन

**नागपूर :** आंध्र प्रदेशातील न्यायालयात एका कनिष्ठ वकिलासोबत झालेल्या गैरवर्तन, अपमानास्पद वागणूक तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना जेलमध्ये पाठविण्याच्या आदेशाच्या निषेधार्थ जिल्हा वकील संघटना, नागपूर तर्फे तीव्र आंदोलन करण्यात आले.

या निषेध आंदोलनात जिल्हा न्यायालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर मोठ्या संख्येने वकील एकत्र आले होते. सर्व वकिलांनी आपल्या कोटावर लाल पट्टी लावून घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. न्यायव्यवस्थेमध्ये वकिलांना सन्मानपूर्वक वागणूक मिळावी, न्यायाधीश वर्गाने वकिलांशी आदराने संवाद साधावा तसेच वकिलांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जिल्हा वकील संघाच्या या आंदोलनामध्ये अँड. प्रकाश जयस्वाल, अँड. अनिल एच. गुल्हाने, अँड. वैशाली बगाडे, अँड. प्रीती पिंपळकर (गमे), अँड. सुशांत पाटील, अँड. पूजा आर. शर्मा, अँड. मेघना बोबडे, अँड. इंद्रदीप सिंग कलसी, अ‍ॅड. हेमंत कठावते, अ‍ॅड. शादाब खान, अ‍ॅड. मनीष भांगेकर, अ‍ॅड. महेश चौधरी, अँड. संजय तिजारे, अँड. आशिष नायक, अँड. निखिल शर्मा, अँड. संदीप डोनारकर, अँड. लतीफ फारुकी, अँड. राहुल परमार, अँड. अविनाश बालपांडे, अँड. संजय पिंपळे, अँड. अनिल बारड, अँड. ऐश्वर्या अलोने, अँड. मनीष भगतकर, अँड. सेजल जैन, अँड. वीरेंद्र रंगारी, अँड. कल्याणी घोडेस्वर, अँड. फकीरा शाहू, अँड. ममता दुबे, अँड. अजय अडवाणी, अँड. दिव्या चौरिया, अँड. मोबीन खान, अँड. विलास काळभूत यांच्यासह मोठ्या संख्येने वकिलांनी सहभाग नोंदवून निषेध व्यक्त केला.

यावेळी उपस्थित वकिलांनी न्यायव्यवस्थेमध्ये वकील आणि न्यायाधीश यांच्यात परस्पर सन्मानाचे वातावरण कायम राहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात नागपुरात आज महत्त्वपूर्ण बैठक

**नागपूर :** अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण (ABCD) अर्थात आरक्षणाचे विभाजन करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात समाजामध्ये तीव्र चर्चा सुरू असून, या विषयावर विचारविनिमय करण्यासाठी तसेच पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी आज रविवारी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा निर्णय जाहीर केला असला तरी अद्याप बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करण्यात आलेला नाही. त्यामुळे समाजामध्ये संभ्रम आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांकडून पारदर्शकतेची मागणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आज रविवार, १७ मे २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता रवि भवन सभागृह येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत उपवर्गीकरणाच्या संभाव्य परिणामांवर चर्चा करण्यात येणार असून, समाजाची एकजूट मजबूत करण्याबरोबरच पुढील आंदोलनाची रणनीती ठरविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

समाजातील विविध घटकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## आज स्मृतिशेष का. रा. वालदेकर यांना श्रद्धांजली सभा

**नागपूर :** मूक्तीवाहीनी तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने स्मृतिशेष का. रा. वालदेकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा रविवार, दिनांक 17 मे 2026 रोजी सायंकाळी 5:30 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत ताराचंद्र खांडेकर हे राहणार आहेत. या श्रद्धांजली सभेमध्ये विविध सामाजिक, साहित्यिक व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून स्मृतिशेष का. रा. वालदेकर यांच्या सामाजिक कार्य, विचारधारा व योगदानाला अभिवादन करण्यात येणार आहे.

## बामसेफचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुखदेव वाहाने यांचे निधन

**नागपूर :** बामसेफचे सक्रिय कार्यकर्ते तथा झिंगाबाई टाकळी, मानकापूर निवासी सुखदेव अर्जुन वाहाने यांचे वयाच्या ७० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे बामसेफ आणि बहुजन चळवळीत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



सुखदेव वाहाने हे केंद्र सरकारच्या अकाउंट ऑफिसर पदावर कामठी येथील मिलिटरी विभागात कार्यरत होते. १९७८ पासून त्यांचा कांशीराम यांच्याशी संपर्क आला होता. त्यानंतर त्यांनी कामठी, कन्हान, रामटेक, मौदा, पारशिवनी आदी परिसरात बामसेफ आणि बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे उभे करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

मानकापूर घाट येथे बसपा नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडले. त्यांच्या पश्चात पत्नी शालिनी वाहाने, मुलगी डॉ. प्रीती वाहाने-शिंदे तसेच अभिलेश आणि सुमेध अशी मुले व मोठा आप्तपरिवार आहे. सुखदेव वाहाने हे बसपाचे नागपूर जिल्हा सचिव अभिलेश वाहाने यांचे वडील होत.

# आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीचे नाशिकमध्ये जोरदार निदर्शने

## चर्मकार समाजाचाही सहभाग

**नाशिक :** महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रयत्न सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाला चर्मकार समाजासह विविध सामाजिक संघटनांनी पाठिंबा दर्शविला.

बदर समितीचा अहवाल रद्द करावा आणि अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण थांबवावे, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. निदर्शनांनंतर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून शासनाला निवेदन देण्यात आले.

यावेळी माजी न्यायाधीश तथा वैद्य यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "हा महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकाराम यांच्या समतेच्या विचारांचा महाराष्ट्र आहे. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून जाती-जातींमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होऊ नये."



संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रकाश पगारे म्हणाले की, "महाराष्ट्रातील ५८ जाती आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी करत नाहीत. केवळ एका जातीतील काही लोक ही मागणी करीत आहेत. सरकारने सर्व घटकांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतरच निर्णय घ्यायला हवा होता."

समितीचे निमंत्रक अनिल गांगुर्डे यांनी सांगितले की, "आजचे आंदोलन हे केवळ निदर्शने होते. या आंदोलनात सुमारे हजार लोक सहभागी झाले आहेत. मात्र सरकारने उपवर्गीकरणाच्या दिशेने पुढे पाऊल टाकल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."

यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि समाजकल्याण मंत्री यांना उद्देशून निवेदन देण्यात आले. महसूल अधिकारी नरेंद्र जगताप यांनी सुट्टीच्या दिवशी हे निवेदन स्वीकारले.

यावेळी माजी मंत्री बबन घोलप तसेच चर्मकार महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलनात प्रकाश पवार, अनिल वैद्य, सनीभाई रोकडे, अनिलभाई गांगुर्डे, लक्ष्मी ताठे, प्रवीण गांगुर्डे, अरुण दोंदे, मुकुंदराव काळे, डॉ. राजन शिंदे, सुरेश गांगुर्डे, रमेश पाखरे, अशोक अहिरे, सुनील यशवंते, विजय लोखंडे, संजय खैरनार, दीपक जाधव, दत्तात्रय गोतीसे, डॉ. अनिल आठवले, कैलास तेलोरे, किशोर गांगुर्डे, राहुल जगताप यांच्यासह मातंग समाज नेते शाम लोंढे आणि बबरुवान शिंदे यांनीही सहभाग घेत पाठिंबा दर्शविला.